जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# दारूच्या नशेत तरुणाचा वाहनांवर डोके आपटून राडा; दोन गाड्यांच्या काचा फोडत केले नुकसान, गुन्हा दाखल

नगर - दारूच्या नशेत एका तरुणाने स्वतःचे डोके वाहनांवर आपटून दोन चारचाकी गाड्यांच्या समोरील काचा फोडल्याची विचित्र घटना नगर शहरातील लालटाकी परिसरातील मिसगर कॉलनीत घडली. या घटनेत वाहनांचे नुकसान करण्यासह तो स्वतःही जखमी झाला आहे. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत परवेज युनूस शेख (वय ३३, रा.मिसगर कॉलनी, लालटाकी)यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांचे ग्राहक सेवा केंद्र आहे. शेख यांची मारुती ८०० गाडी (क्र.एमएच १६ आर २२१९) आणि त्यांचे मित्र शाहरुख फकीर शेख यांची होंडा सिटी गाडी (क्र. एमएच १२ एलपी ७९५०) ही मिसगर कॉलनीमधील 'एस एस डेंटिंग पेंटिंग' दुकानासमोर पार्क केलेली होती. १८ ऑगस्टच्या रात्री पावणेबारा वाजेच्या सुमारास, सिद्धार्थनगर येथील रहिवासी दीपक भागवत वैरागर (वय २७) हा दारूच्या नशेत त्या ठिकाणी आला. त्याने अचानक या दोन्ही गाड्यांच्या समोरील काचांवर स्वतःचे डोके जोराने आदळण्यास सुरुवात केली. यात दोन्ही गाड्यांच्या काचा फुटून मोठे नुकसान झाले, तर दीपक वैरागर हा स्वतःच्या डोक्याला दुखापत करून घेत जखमी झाला.

घटनेनंतर जखमी तरुणाला उपचारासाठी अहिल्यानगर येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. परवेज युनूस शेख यांनी दिलेल्या तक्रारीवरून तोफखाना पोलिसांनी दीपक भागवत वैरागर याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३२४ (२) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रवीण पाटील करत आहेत.

# हद्दपारीचा आदेश धुडकावून शहरात फिरणारा गुन्हेगार जेरबंद

नगर -अहिल्यानगर जिल्ह्यातून सहा महिन्यांसाठी हद्दपार केलेल्या एका आरोपीने शहरात बेकायदेशीररीत्या प्रवेश केल्याचे उघडकीस आले असून, तोफखाना पोलिसांनी त्याच्यावर गुन्हा दाखल केला आहे. करण खंडू पाचारणे (वय ३२, रा. आदर्शनगर, नागापूर, एम.आय.डी.सी., अहिल्यानगर) असे गुन्हा दाखल झालेल्या आरोपीचे नाव आहे.

उपविभागीय दंडाधिकारी यांनी आरोपी करण पाचारणे याला २९ एप्रिल २०२६ पासून सहा महिन्यांसाठी अहिल्यानगर जिल्ह्यातून हद्दपार केले होते. असे असतानाही आरोपीने कोणत्याही सक्षम अधिकाऱ्याची पूर्वपरवानगी न घेता हद्दपारीच्या आदेशाचा भंग केला. १९ ऑगस्ट रोजी सकाळी पावणेअकरा वाजेच्या सुमारास तो अहिल्यानगर शहरातील कॉटेज कॉर्नर ते पडक्या महालाकडे जाणाऱ्या रस्त्यावरील एका चहाच्या टपरीसमोर संशयास्पदरीत्या फिरताना पोलिसांना मिळून आला.

या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्याचे पोलीस अंमलदार बाळासाहेब भापसे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आरोपी करण पाचारणे याच्याविरुद्ध महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १४२ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# घराच्या अंगणातच गांजाची लागवड केल्याचा प्रकार उघडकीस

## पोलिसांचा छापा; ३ लाख २३ हजारांचा ६४.७३ किलो गांजा जप्त, एकाला अटक

नगर - अहिल्यानगर तालुक्यातील धनगरवाडी येथे स्वतःच्या घरासमोरील अंगणात गांजाची बेकायदेशीर लागवड करणाऱ्या एका इसमावर एमआयडीसी पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत पोलिसांनी सुमारे ३ लाख २३ हजार ६५० रुपये किमतीचा तब्बल ६४.७३ किलोग्रॅम ओला गांजा जप्त केला असून आरोपीला अटक केली आहे.

पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांना मौजे धनगरवाडी येथे आरोपी अनिल लक्ष्मण विरकर (वय ४९) याने राहत्या घराच्या अंगणात आणि पायऱ्यांच्या जागेत गांजाच्या झाडांची लागवड केली असल्याची माहिती मिळाली. ही माहिती मिळताच त्यांनी नगर ग्रामीणचे पोलिस उपअधीक्षक शिरीष वमने, एमआयडीचे सहाय्यक पोलीस निरीक्षक माणिक चौधरी यांना कारवाईचे आदेश दिले. त्यानुसार पथकाने १९ ऑगस्ट रोजी सायंकाळी घटनास्थळी छापा टाकला.



घरासमोरील अंगणात गांजाची बेकायदेशीर लागवड करणाऱ्या इसमासमवेत एमआयडीसी पोलिस.

या कारवाईदरम्यान पोलिसांनी अंगणातील गांजाची पाने, फांद्या व बोंडे असा एकूण ९ गोण्यांमध्ये भरलेला ६४.७३ किलोग्रॅम गांजा आणि मुद्देमाल ताब्यात घेतला. फॉरेन्सिक पथकाच्या उपस्थितीत घटनास्थळाचा पंचनामा करून माल सील करण्यात आला.

याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार सुशांत सूर्यभान दिवटे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आरोपी अनिल लक्ष्मण विरकर याच्याविरुद्ध अंमली पदार्थ विरोधी कायद्यानुसार (एनडीपीएस) गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी आरोपीला रात्री पावणेबाराच्या सुमारास अटक केली असून, या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अमोल गर्जे करत आहेत.

ही कारवाई उपअधीक्षक शिरीष वमने, सपोनि. माणिक चौधरी, उपनिरीक्षक अमोल गर्जे, अजय कौटे, पोलिस अंमलदार सुदाम लोंढे, सुशांत दिवटे, सचिन हरदास, उमेश शेरकर, सूरज देशमुख, अक्षय रोहोकले यांच्या पथकाने केली.

## रत्नमाला गायकवाड यांचे दु:खद निधन



नगर - येथील श्रीमती रत्नमाला अशोकराव गायकवाड (वय ६५) यांचे २० ऑगस्ट रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नेवासा चांदा येथील राहत्या घरी शेतामध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे १ मुलगा, सुन, २ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. हर्षल गायकवाड यांच्या मातोश्री तर दिवंगत अशोकराव गायकवाड यांच्या त्या पत्नी होत.

## नसीम शेख यांचे अल्पशा आजाराने निधन



नगर - फकीरवाडा रोड येथील रहिवासी नसीम उस्मान रावसाहेब शेख (वय ६०) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांचा दफनविधी लाल टाकी येथील जलाल शाह बुखारी कब्रस्तान येथे करण्यात आला.

त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, एक मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. नसीम शेख या पाटबंधारे विभागाचे निवृत्त अभियंता शेख उस्मान रावसाहेब यांच्या पत्नी तर सामाजिक कार्यकर्ते फरमान व इरफान यांच्या मातोश्री होत.

# शिल्पांच्या माध्यमातून प्रबोधन अन् शहराच्या सौंदर्यात भर

## माझी वसुंधरा अभियानातून विविध चौकांचे सुशोभीकरण

नगर - अहिल्यानगर महानगरपालिकेच्या माध्यमातून माझी वसुंधरा अभियानांतर्गत शहरातील विविध चौकांचे सुशोभीकरण करण्यात येत असून, विविध विषयांवर आधारित आकर्षक शिल्पांच्या माध्यमातून विज्ञान-तंत्रज्ञान, शिक्षण,पर्यावरण, स्वच्छता, सामाजिक संदेश आणि नागरिकांमध्ये जनजागृतीचे काम केले जात आहे. या शिल्पांमुळे शहराच्या सौंदर्यात भर पडली असून, शहरातील प्रमुख चौकांना नवे आकर्षक रूप प्राप्त झाले आहे.

अहिल्यानगर शहराची विकासकामांच्या माध्यमातून खेड्याची ओळख पुसत आता विकसित शहराच्या दिशेने वाटचाल सुरु आहे. आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून शहरातील विविध विकास प्रकल्पांसाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला असून, रस्ते, पथदिवे, महापालिकेचे हॉस्पिटल, क्रीडा संकुल, बसस्थानक यांसह विविध विकासकामांना गती मिळाली आहे. विकासकामांसोबतच शहराचे सौंदर्य वाढविण्यावरही विशेष भर देण्यात येत आहे. याचाच एक भाग म्हणून महानगरपालिकेच्या माध्यमातून माझी वसुंधरा अभियानांतर्गत शहरातील विविध चौकांमध्ये आकर्षक शिल्पे उभारण्यात आली आहेत. या शिल्पांमधून पर्यावरण संवर्धन, वृक्षसंवर्धन, स्वच्छता, जलसंवर्धन तसेच सामाजिक जबाबदारीचे संदेश प्रभावीपणे नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येत आहेत. त्यामुळे ही शिल्पे केवळ चौकांचे सौंदर्य वाढविणारी ठरत नसून, नागरिकांमध्ये प्रबोधनाचे प्रभावी माध्यमही बनली आहेत.





शहरातील विविध चौकात उभारण्यात आलेली शिल्प शहराच्या सौंदर्यात भर घालत आहेत. (छाया - लहू दळवी)

बुरुडगाव रोड, साईनगर, वाकोडी रोड, नामदे चौक, पाऊलबुद्धे शाळा परिसर, पारिजात चौक, शीला विहार चौक, रासनेनगर चौक आणि गंगा उद्यान चौक आदी भागांमध्ये उभारण्यात आलेली शिल्पे सध्या नगरकरांच्या आकर्षणाचे केंद्र बनली आहेत. या शिल्पांमुळे चौकांचे स्वरूप बदलले असून, शहरात प्रवेश करणाऱ्या नागरिकांचेही लक्ष वेधले जात आहे. शहराचा विकास हा केवळ रस्ते, इमारती आणि पायाभूत सुविधांपुरता मर्यादित न राहता शहराचे वातावरण सुंदर, स्वच्छ आणि नागरिकांना आनंददायी असावे, यासाठीही प्रयत्न होणे आवश्यक आहे. याच उद्देशाने महानगरपालिकेच्या माध्यमातून विविध चौकांचे सुशोभीकरण करण्यात येत आहे. आकर्षक शिल्पांमुळे शहरातील प्रमुख चौकांना एक वेगळी ओळख मिळत असून, शहराच्या सौंदर्यातही लक्षणीय भर पडत आहे. शहरातील विविध ठिकाणी उभारण्यात आलेली ही शिल्पे नागरिकांचे लक्ष वेधून घेत असून, भविष्यात शहरातील पर्यटनाच्या दृष्टीनेही ती महत्त्वाची ठरू शकतात. चौकांचे सुशोभीकरण, आकर्षक शिल्पे, स्वच्छ परिसर आणि हरित वातावरण यामुळे शहराचा चेहरामोहरा बदलण्यास मदत होत आहे.

## पाईपलाईन रोड वरून मोटारसायकलची चोरी

नगर - पाईपलाईन रोड वर सागर हॉटेल जवळ सुरु असलेल्या एका बांधकामाच्या ठिकाणी लावलेली बजाज कंपनीची सीटी १०० मोटारसायकल (क्र. एमएच १७ बीके७६५७) अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे.

याबाबत साहेबराव नाना शिंदे (वय ५३, रा. सागर हॉटेल समोर श्रीराम चौक, पाईपलाईन रोड) यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे सदर बांधकामाच्या ठिकाणी वॉचमन म्हणून काम करतात. त्यांनी त्यांची मोटारसायकल बांधकाम चालू असलेल्या ठिकाणी उभी केली होती. अज्ञात चोरट्यांनी त्यांची नजर चुकवून ती चोरुन नेली.

या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## चेनसुखलाल गुंदेचा यांचे हृदयविकाराने निधन



नगर - मिरी येथील रहिवासी चेनसुखलाल गिरधारी गुंदेचा (मिरीवाला) (वय ८२) यांचे २० ऑगस्ट रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर मिरी येथील वैकुंठधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले

त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, २ मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. प्रशांत व महावीर यांचे ते वडील होत.

## नितेश कंत्रोड यांचे हृदयविकाराने निधन



श्रीरामपूर - जय भोले चौक पंजाबी कॉलनी, वॉर्ड नं.१, गोंधवणी रोड येथील रहिवासी जय भोले ग्रुपचे संयोजक नितेश (मोट्या) अमरीकलाल कंत्रोड (वय ४३) यांचे १९ ऑगस्ट रोजी हृदयविकाराने निधन झाले.

त्यांच्या मागे आई, पत्नी, मुलगा, मुलगी असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार २० ऑगस्ट रोजी करण्यात आले.

## शारदाबाई बैरागी यांचे हृदयविकाराने निधन



श्रीरामपूर - येथील तांबे चाळ, वॉर्ड नं.१, श्रीरामपूर येथील रहिवासी सौ.शारदाबाई रघुवीरदास बैरागी (वय ७५) यांचे २० ऑगस्ट रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, तीन मुली, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

रयत शिक्षण संस्थेचे जनता हायस्कूलचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक रघुवीरदास बजरंगदास बैरागी यांच्या पत्नी, अखंडानंद आश्रम रोड वरील एबी डिझेलचे संचालक हेमंत (दत्ता) बैरागी यांच्या मातोश्री, सॉफ्टवेअर इंजिनियर महेश नारायणदास बैरागी यांच्या चुलती, डॉ.गणेश दिगंबर बैरागी तर डॉ.जयेश दिगंबर बैरागी, चि. ऋषिकेश दत्तात्रय बैरागी कु. अदिती दत्तात्रय बैरागी यांच्या त्या आजी होत.

## सिमाबाई लगे यांचे अल्प आजाराने निधन



श्रीरामपूर - येथील शिंदे चाळ, जिजामाता चौक जवळ, नगरपरिषद दवाखाना मागे, माळी बोर्डिंग समोरील रहिवासी सौ.सिमाबाई चंद्रकांत लगे (वय ६८) यांचे १५ ऑगस्ट रोजी अल्प आजाराने दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर १५ ऑगस्ट रोजी अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, मुली, सून, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. श्रीरामपूर प्रगत बागायतदार सोसायटीचे माजी मॅनेजर चंद्रकांत विठ्ठलराव लगे यांच्या त्या पत्नी तर श्रीकांत लगे यांच्या मातोश्री होत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# मनमाड रस्ता आणि ट्रम्प विधानावर डॉ. सुजय विखे पाटील ठाम

## विरोधकांना थेट प्रत्युत्तर देत पुराव्यांसह मांडली आपली भूमिका



शिर्डी - अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या संदर्भात केलेल्या वक्तव्यावर मी ठाम आहे. अभ्यासू पणे केलेले हे वक्तव्य विरोधकांना न समजल्याने व तेवढा अभ्यास त्यांचा नसल्याने राजकीय पोळी भाजण्यासाठी ते रान उठवत आहेत. या प्रश्नावर मला विरोधकांना उत्तर देण्याची गरज नाही परंतु जनतेला उत्तर देणे माझे दायित्व आहे. रस्त्याच्या कामांना युद्धजन्य परिस्थिती व डोनाल्ड ट्रम्प हेच जबाबदार असल्याचे वक्तव्यावर मी आजही ठाम असल्याचा पुनर्रउच्चार करत दारू पिणाऱ्यांची संख्या वाढली हे वक्तव्य मी मार्मिक व मिश्किल पणे केले होते याचा अर्थ काहींनी वेगळा काढला आहे हे मिस्कील वक्तव्य मी मागे घेत असल्याचे भारतीय जनता पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनी पत्रकार परिषदेत सांगितले

डॉ. विखे पाटील यांनी शिर्डी येथे पत्रकार परिषद घेतली. यावेळी शिर्डी नगर परिषदेच्या नगराध्यक्षा जयश्रीताई थोरात प्रथम नगराध्यक्ष कैलास बापू कोते राजेंद्र गोंदकर यांच्यासह नगरसेविका व नगरसेवक उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना डॉ सुजय विखे पाटील म्हणाले की, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे कार्यपद्धतीमुळे युद्ध लादल्याने डांबराची उपलब्धता व आयात कमी झाली डांबर आयातीवर संकट आले त्यामुळे देशातील अनेक रस्त्यांची कामे थांबली त्यात अहील्यानगर मनमाड या राष्ट्रीय महामार्गाचे काम सुद्धा संथ गतीने होत आहेत अमेरिकेच्या युद्ध धोरणामुळे पश्चिम आशियातून डांबराचा पुरवठा घटला, दर वाढले आणि त्याचा परिणाम देशातील रस्त्यांच्या कामांवर झाला,' या आपल्या आधीच्या वक्तव्यावर माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील ठाम राहिले आहेत. 'मी प्रत्येक वाक्य पूर्ण अभ्यास करून बोलतो. माझ्या वक्तव्याला अधिकृत आकडेवारी, शासकीय पत्रे आणि परदेशी व भारतातील विविध वृत्तपत्रांतील वृत्तांचे आधार आहेत. त्यामुळे मी माझ्या भूमिकेवर ठाम आहे,' असे त्यांनी स्पष्ट केले. नगर-मनमाड रस्त्याच्या रखडलेल्या कामावरून विरोधकांनी केलेल्या टीकेला प्रत्युत्तर देताना त्यांनी आक्रमक भूमिका मांडली.

भारताला दरवर्षी सुमारे ९० लाख मेट्रिक टन डांबराची गरज भासते. त्यातील सुमारे निम्मे डांबर देशांतर्गत तेलशुद्धीकरण कारखान्यांमध्ये तयार होते, तर उर्वरित डांबर इराक, संयुक्त अरब अमिराती, इराण आणि बहरीन या देशांतून आयात केले जाते, असा दावा डॉ. विखे यांनी केला. युद्धजन्य परिस्थितीमुळे या देशांतून होणाऱ्या डांबराच्या आयातीवर मोठा परिणाम झाला असून, आयातीत सुमारे ७८ टक्क्यांची घट झाली असल्याचे त्यांनी सांगितले.

### दर ४८ हजारांवरून ८३ हजार ६५२ रुपये

डांबराच्या दरवाढीची आकडेवारीही त्यांनी मांडली. फेब्रुवारी २०२६मध्ये प्रति मेट्रिक टन सुमारे ४८ हजार रुपये असलेला डांबराचा दर काही महिन्यांत वाढून ८३ हजार ६५२ रुपयांवर पोहोचला. त्यामुळे दरात सुमारे ७१ टक्क्यांची वाढ झाली आहे. डांबराच्या वाढलेल्या दरामुळे रस्त्यांच्या कामांवर परिणाम झाला असून, केंद्र सरकारने कंत्राटदारांना वाढीव दर देण्यासंदर्भात पत्रव्यवहार केल्याचे त्यांनी सांगितले.

आपल्या वक्तव्याच्या समर्थनार्थ केंद्र सरकारची अधिकृत आकडेवारी, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाची पत्रे तसेच विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय वृत्तपत्रांतील वृत्तांचे दाखले त्यांनी दिले. 'विरोधकांनी आधी जागतिक घडामोडींचा अभ्यास करावा आणि मगच टीका करावी,' असा टोला त्यांनी लगावला.

### 'ठेकेदारावर कारवाई केली तर रस्ता कोण पूर्ण करणार?'

रस्त्याच्या कामाची चौकशी करून ठेकेदारावर कारवाई करण्याची मागणी करणाऱ्या विरोधकांनाही त्यांनी सवाल केला. 'काही नेते चौकशी लावण्यासाठी आणि गुन्हे दाखल करण्यासाठी केंद्राला चार-चार पानी पत्रे पाठवत आहेत. ठेकेदारावर कारवाई होऊन तो काम सोडून गेला, तर उर्वरित रस्ता हे नेते स्वतः पूर्ण करून देणार आहेत का? याचे उत्तर त्यांनी आधी जनतेला द्यावे,' असे आव्हान त्यांनी दिले. केवळ पत्रे पाठवून आणि आरोप करून रस्त्याचा प्रश्न सुटणार नाही. जनतेला दर्जेदार आणि पूर्ण रस्ता हवा आहे. त्यामुळे काम थांबविण्याऐवजी ते पूर्ण करून घेण्याला प्राधान्य दिले पाहिजे, अशी भूमिका त्यांनी मांडली.

'रस्त्यासाठी आवाज उठवायला ग्रामपंचायत सदस्य असण्याची गरज नाही. मी या देशाचा करदाता नागरिक आहे. जनतेच्या आणि कार्यकर्त्यांच्या करातून हा रस्ता होत आहे. या रस्त्यावर अपघातात जीव गमावणारे नागरिक माझे आहेत. त्यामुळे एक जबाबदार नागरिक म्हणून मला प्रश्न विचारण्याचा आणि काम पूर्ण करून घेण्याचा पूर्ण अधिकार आहे,' असे विखे म्हणाले.

## तारकपूर-स्वस्तिक बसस्थानकादरम्यान प्रवाशांना मज्जाव केल्यास होणार कारवाई

नगर - रा.प. तारकपूर बसस्थानक ते रा.प. स्वस्तिक बसस्थानक तसेच स्वस्तिक बसस्थानक ते तारकपूर बसस्थानकादरम्यान प्रवास करू इच्छिणाऱ्या प्रवाशांना प्रवासास नकार दिला जात असल्याच्या तक्रारी एस.टी. महामंडळाच्या तारकपूर आगार कार्यालयाकडे प्राप्त झाल्या आहेत. या प्रकाराची दखल घेत तारकपूर आगार व्यवस्थापनाने सर्व एस.टी. बसच्या चालक व वाहकांना प्रवाशांना बस मध्ये घेण्याच्या सूचना दिल्या आहेत.

या दोन्ही बसस्थानकांदरम्यान प्रवास करू इच्छिणाऱ्या कोणत्याही प्रवाशाला प्रवास करण्यास मज्जाव करू नये, असे स्पष्ट आदेश देण्यात आले आहेत. प्रवाशांना प्रवासास नकार देणे किंवा त्यांना जाणूनबुजून मज्जाव केल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित चालक अथवा वाहकावर नियमानुसार कारवाई करण्यात येईल, असा इशाराही आगार व्यवस्थापनाने दिला आहे. वृतपत्रातील बातम्यांची तसेच

प्रवाशांच्या तक्रारींची दखल घेत तारकपूर आगाराने दिलेल्या या सूचनेमुळे तारकपूर व स्वस्तिक बसस्थानकादरम्यान प्रवास करणाऱ्या प्रवाशांना दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे. या आदेशामुळे स्वस्तिक ते तारकपूर दरम्यान नियमित प्रवास करणाऱ्या प्रवाशांनी राज्य परिवहन मंडळाच्या अहमदनगर विभागातील सर्व अधिकारी तसेच कर्मचाऱ्यांचे आभार व्यक्त केले आहेत.

# एसटी कर्मचाऱ्याला लुटणाऱ्या दोघांना ठोकल्या बेड्या

## लुटीतील मोबाईल, रोकड सह मुद्देमाल जप्त, एका फरार आरोपीचा शोध सुरु

नगर - पुणे बसस्थानक परिसरातून एसटी कर्मचाऱ्याला दुचाकीवरून उचलून बुरुडगाव रोडवरील निर्जनस्थळी नेऊन मारहाण करत मोबाईल व रोकड लुटणाऱ्या दोघांना कोतवाली पोलिसांनी अवघ्या काही तासांत ताब्यात घेतले. आरोपींकडून मोबाईल, रोख रक्कम आणि गुन्ह्यात वापरलेली दुचाकी असा सुमारे ७२ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



बस स्थानकातून एसटी कर्मचाऱ्याचे अपहरण करत लुटणाऱ्या दोघांना पकडल्यानंतर त्यांच्या समवेत कोतवाली पोलिसांचे पथक.

अभिषेक सुनिल शिरसाठ (वय २३, रा. अंबर अपार्टमेंट, सावेडी रोड, अहिल्यानगर) आणि अनुश शांतवन धिवर (रा. संत ज्ञानेश्वर अपार्टमेंट, सावेडी, अहिल्यानगर) अशी ताब्यात घेतलेल्या संशयित आरोपींची नावे आहेत. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात १८ ऑगस्ट रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.

फिर्यादी पुणे बसस्थानक परिसरात असताना आरोपींनी त्यांना बुरुडगाव रोड परिसरातील निर्जनस्थळी नेले. तेथे लाकडी दांडक्याने तसेच लाथाबुक्क्यांनी मारहाण करून त्यांच्या खिशातील मोबाईल जबरदस्तीने काढून घेतला. त्यानंतर मोबाईल व फोन-पेचा पासवर्ड घेऊन त्यांच्या खात्यातून ७ हजार १०० रुपये अनोळखी खात्यावर वर्ग करण्यात आले. त्यानंतर आरोपींनी फिर्यादीला तेथेच सोडून पलायन केले. घटनेनंतर कोतवाली पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास सुरुवात केली. तसेच तांत्रिक विश्लेषण आणि गुप्त बातमीदारांच्या मदतीने आरोपींचा शोध घेण्यात आला. या तपासातून दोन संशयितांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. आरोपींनी हा गुन्हा त्यांचा साथीदार प्रविण शेजवळ (रा. कोंढवड, ता. राहुरी, जि. अहिल्यानगर) याच्यासह केल्याचे पोलिसांना सांगितले. गुन्ह्याच्या वेळी दुचाकी वापरल्याचेही तपासात समोर आले आहे. पोलिसांनी आरोपींकडून एकूण ७२ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

ही कारवाई पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक गणेश देशमुख, दीपक मेढे, पोलीस अंमलदार बाळकृष्ण दौड, रोहिणी दरंदले, राहुल शिंदे, विनोद बोरगे, साबीर शेख, विशाल दळवी, दीपक रोहकले, शिरीष तरटे, सुरज कदम, सत्यम शिंदे, दत्तात्रय कोतकर, अतुल काजळे, अमोल गाडे, सचिन लोळगे, महेश पवार, रमेश शिंदे, संकेत धिवर, अतुल लाटे, पोकॉ रोहित ठोंबे, पल्लवी रोहकले तसेच दक्षिण मोबाईल सेलचे पोकॉ राहुल गुंडु यांच्या पथकाने केली आहे.

# स्व. माधवराव मुळे प्रतिष्ठानच्या निबंध व चित्रकला स्पर्धेतील विजेत्यांचा पारितोषिक प्रदान करुन गौरव

### स्पर्धेत जिल्ह्यातील ५ हजार ५२१ स्पर्धकांनी घेतला सहभाग



जिल्हास्तरीय चित्रकला व निबंध स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिक प्रदान करुन गौरविण्यात आले.

नगर – स्व. माधवराव दगडूजी मुळे प्रतिष्ठानच्या वतीने शिक्षणमहर्षी स्व. माधवरावजी मुळे तथा आबा यांच्या ९४ व्या जयंतीनिमित्त आयोजित जिल्हास्तरीय चित्रकला व निबंध स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ नुकताच उत्साहात पार पडला. जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यातून तब्बल ५ हजार ५२१ स्पर्धकांनी या स्पर्धेत सहभाग नोंदविला. विशेषतः निबंध स्पर्धेच्या खुल्या गटात शालेय शिक्षक, प्राध्यापक तसेच नागरिकांनी प्रतिसाद दिला.

न्यू टिळक रोड येथील सरदार पटेल मंगल कार्यालयात आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नांदेड व लखनौ विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. सर्जेराव निमसे होते. ज्येष्ठ संपादक सुधीर लंके प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी प्रतिष्ठानचे अध्यक्ष मुकेश मुळे, उपाध्यक्ष प्राचार्य दत्ता पाटील नारळे, सचिव प्राचार्य डॉ. एम. एम. तांबे, खजिनदार बजरंग पाडळकर, डॉ. महेश मुळे, प्रा. लालचंद हराळ, मीनाताई पोटे, प्रा. गणेश भगत, निलेश काळदाते, सुनील म्हस्के, महेश मुळे यांच्यासह प्राचार्य, मुख्यध्यापक, विद्यार्थी, शिक्षक व पालक उपस्थित होते.

प्रास्ताविकात डॉ. एम. एम. तांबे यांनी प्रतिष्ठानची भूमिका स्पष्ट केली. चित्रकला स्पर्धेचे परीक्षण करणारे कलाशिक्षक शारदा साठे, निलेश गणगले, मनीषा कदम, सचिन सांगळे, नारायण शेळके व अली चंद्रकांत तसेच निबंध स्पर्धेचे परीक्षक सविता सानप, प्रीती प्रभुणे, जयश्री देशपांडे, दत्तात्रय नकुलवाड, सुप्रिया पागिरे–वाळके व प्रा. गणेश भगत यांचा पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. स्पर्धक वैशाली मंगलाराम यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, या स्पर्धेमुळे सुप्त कलागुणांना वाव मिळाला.

माजी कुलगुरू डॉ. सर्जेराव निमसे म्हणाले, भावार्थ व विचार निबंध आणि चित्रकलेतून मांडता आला पाहिजे. चित्रकला व निबंधामध्ये कल्पनाशक्ती आणि बौद्धिक कुतूहल ही साम्याची गोष्ट आहे. हिटलरला निबंधातून उत्तर मिळाले. सध्या अनावश्यक निर्बंध लादले जात आहेत. वैचारिक निबंधातून त्याला उत्तर द्यावे लागणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी डॉ. निमसे यांनी स्व. माधवराव मुळे यांच्याशी असलेले आपले वैयक्तिक नातेही उलगडले. नवनिर्मितीची उर्मी घेऊन आबांनी काम केले आणि संस्थेचा पाया रचला. प्राचार्यांच्या कामात त्यांनी ढवळाढवळ केली नसल्याचेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. गणेश भगत यांनी केले. आभार दत्ता पाटील नारळे यांनी मानले.

चित्रकला स्पर्धेतील विजेते – इयत्ता पहिली ते दुसरी गट : प्रथम– श्रेयांश अभिषेक मरकड (महाराष्ट्र बालक मंदिर), द्वितीय– यशांजली संतोष टिमकरे (महाराष्ट्र बालक मंदिर), इर्शिता ऋषिकेश खंडागळे (समर्थ विद्या मंदिर), तृतीय– शिवराज संतोष फंड (नूतन मराठी शाळा), उत्तेजनार्थ – रुद्र महेश चिपोले (आनंद विद्यालय), प्रान्शी योगेश जगताप (केंद्रीय विद्यालय, दरेवाडी).

इयत्ता तिसरी ते चौथी गट : प्रथम– आरोही अमृत जुंबड (नूतन मराठी प्राथमिक शाळा), द्वितीय– विनय विशाल गांधी (पोदार इंटरनॅशनल स्कूल), तृतीय– गार्गी अक्षय आकडे (आनंद विद्यालय), उत्तेजनार्थ– पायल निलेश पवार (श्री समर्थ विद्या मंदिर), मयुरी गणेश सुपेकर (वि. ल. कुलकर्णी विद्यालय).

इयत्ता पाचवी ते सातवी गट : प्रथम– संचित नामदेव कुलट (रेसिडेन्शिअल हायस्कूल), द्वितीय– रुद्र प्रशांत कार्ले (श्री शाहू विद्या मंदिर, खडांबे), पृथ्वीराज मुकुंदा मोढवे, तृतीय– आश्व संदिप पवार (जनता विद्यालय, रुईछत्तीसी), उत्तेजनार्थ– अवनी किशोर चेमटे (श्री समर्थ विद्या मंदिर), श्रावणी सुनील लांडगे (नवभारत विद्यालय, देहरे).

निबंध लेखन स्पर्धेतील विजेते – इयत्ता आठवी ते दहावी गट:प्रथम–क्रमांक विभागून देवीका महेश साळुंके (रेसिडेन्शिअल हायस्कूल), इनामदार आलिया महेबूब (मुलिका देवी विद्या मंदिर, निघोज), द्वितीय– क्रमांक विभागून श्रीशा प्रसाद सोनवणे (रेसिडेन्शियल हायस्कूल, शेवगाव), रित्विका भाऊसाहेब गोंडगिरे (समर्थ विद्या मंदिर, नगर), तृतीय– श्रावणी प्रभाकर काकडे (मोतीलालजी बोरा न्यू इंग्लिश स्कूल), उत्तेजनार्थ–मृणाली मुटकुळे (भारतीबाबा विद्यालय, चिकणी), ज्ञानेश्वरी दिगंबर तोडमल (नवभारत विद्यालय, देहरे).

महाविद्यालयीन गट (इयत्ता अकरावी ते पदवी) : प्रथम – माधुरी कैलास जगताप (यशवंतराव चव्हाण कॉलेज, वांबोरी), द्वितीय– नचिकेत दत्तात्रय पवार (न्यू आर्ट्स कॉलेज), तृतीय– प्रतीक्षा विलास फटांगरे (बाळेश्वर उच्च माध्यमिक, सारोळे पठार), उत्तेजनार्थ– सरिका रमेश टिळेकर (मलिकादेवी, निघोज), सिद्धी प्रवीण पंडित (रचना कला महाविद्यालय).

खुला गट : प्रथम– वैशाली एकनाथ मंगलारम (महाराष्ट्र बालक मंदिर), द्वितीय– आरती सुनील मांढरे (न्यू आर्ट्स कॉलेज), तृतीय– सायली देवराम घुले (श्री बाळेश्वर उच्च माध्यमिक विद्यालय), उत्तेजनार्थ ज्योती संतोष जाधव (न्यू आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, पारनेर), लीना अशोक बंगाळ (समर्थ विद्या मंदिर, नगर).

# प्रेरणादायी अक्षरधन

### धन वाढल्यावर आनंदाला उतरण

"मुसाफिर" वाचनीय मननीय अक्षर धन संकलन: दिशान फिचर्स




माणसाजवळ खूप संपत्ती झाली, नाना प्रकारचे ऐश्वर्योपभोग प्रचंड प्रमाणात उपलब्ध झाले, तर आनंदाला अवसर मिळेल, असे वाटते ? पैसा वाढायला लागला चढत्या भाजणीने आणि उपभोगाचे प्रमाण वाढायला लागले. बेसुमार, की आनंद लागतो उतरणीला झरझर हरणे धावतात मृगजळामागे आपली तहान भागवायला. तहान नाही भागत त्यांची. भ्रामक असते ते पाणी.

धन आणि उपभोग, आनंदाचे योग जुळवून आणूच शकत नाहीत. उलट धन भरपूर प्रमाणात मिळाले की, माणसे आनंदाला दुरावलीच समजा. माणूस खूप धन मिळवण्याच्या मागे लागतो, तो केवळ धनप्राप्तीच्या कधीही न पूर्ण होणाऱ्या ईच्छेपायी. आवश्यकतेपायी नाही. उपभोगांची लालसा वाढते ती केवळ इच्छेपायी. गरजेपायी नाही. इच्छा आणि आवश्यकता यात विवेक केलाच पाहिजे. आवश्यकतेला अंत आहे. इच्छा मात्र अनंत आहे. आवश्यकतेपेक्षा पूर्ततेत आनंद आहे. इच्छेच्या पूर्ततेत वाढत्या इच्छेची चिंता आहे. आवश्यकतेप्रमाणे मिळाले की आनंदाचे आले. पण इच्छेप्रमाणे लाभले, असे ही घडलेच नाही. समुद्रावर प्रचंड लाटा न उसळतात तशा इच्छा सदैव उफाळून येतात.

वाढती संपत्ती आणि पुढे हात जोडून उभे विषयोपभोग आनंद देतात. हा भ्रम अस्वस्थ करतो. अस्थिर करतो, लाटतो.

आमचा एक बालपणाचा मित्र भेटला. मोठा बंगला, गाडी, नोकर आणि खाण्यापिण्याची खूप चंगळ, व्यापार खूप वाढविला. पैसा अमाप मिळविला. बँकेतही ठेव आणि तिजोरीतली प्रचंड धनरास त्याने जोडली. पण अजूनही पैसा जोडण्याची इच्छा नव्हतीच शमली. मला त्याने घरी बोलाविले. मिठाई, फळे, काजू वगेरे उत्तम मेवा माझ्यापुढे ठेवला. मला त्याच्या श्रीमंतीने भारावून टाकले. मी म्हटले, तु केवढा रे भाग्यवान। तो हसला. मी मिठाई खाउ लागली. तो फक्त पाहू लागला. मी म्हटले, तु घे ना। त्याने नकार दिला. मला मधुमेह आहे. उच्चदाब आहे. यातलं काहीही खाणं मला विषप्रमाणे बाधक आहे, असे तो म्हणाला. मग एवढं कमावलंस कशाला ? केवळ इच्छा, अनावर इच्छा म्हणूनच । अजूनही सोडतच नाही ती इच्छा माझा पिच्छा।

शेख सादी नावाच्या सुफी संताने एक कहाणी सांगितली आहे. एका श्रीमंताकडे कुणी एक तरुण गेला. तो त्या श्रीमंताकडे कौतुकाने पाहू लागला. श्रीमंत म्हणाला, क्या चाहते हो? तरुण म्हणाला, तुमच्यासारखंच प्रचंड धन मिळवावं आणि आनंद घ्यावा, असं वाटतं श्रीमंत म्हणाला, मी देईन ना तुला तो आनंद. मी जो आनंद घेतोय या संपत्तीचा, तो तुलाही देईन. तरुणाचा आनंद गगनात मावेना. श्रीमंत म्हणाला, रोज सकाळ संध्याकाळ येत जा तू माझ्याकडं.

तो आठ दिवस सकाळ संध्याकाळ त्या श्रीमंताकडे गेला. श्रीमंत त्याला प्रचंड तिजोरीकडे न्यायचा. तिजोरी उघडून त्यातली धनदौलत डोळे भरुन पाहायला सांगायचा.

नवव्या दिवशी तरुण म्हणाला, पण मला तुमचा आनंद हवा. श्रीमंत म्हणाला, मी सकाळ संध्याकाळ दौलत बघण्याचाच आनंद घेत असतो.

**– किशोर गांधी**

# इनामदार स्कूलमध्ये ऐतिहासिक वास्तूंची चित्रकला स्पर्धा व वेशभूषा स्पर्धा संपन्न




इनामदार स्कूलमध्ये स्वातंत्र्यदिनानिमित्त आयोजित वेशभूषा स्पर्धेतील सहभागी विद्यार्थी.

नगर – इकरा एज्युकेशन अँण्ड वेल्फेअर सोसायटीच्या यस पी. ए. इनामदार स्कूल अँण्ड ज्युनियर कॉलेजमध्ये ८० व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त ऐ वतन कार्यक्रमाच्या माध्यमातून ऐतिहासिक वास्तूंचे चित्र तसेच थोर स्वातंत्र्य सेनानींचे चित्र काढण्याची स्पर्धा घेण्यात आली. तसेच थोर स्वातंत्र्य सेनानींच्या वेशभूषेची स्पर्धाही घेण्यात आली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर इंटिग्रिटीचे अध्यक्ष डॉ. सईद शेख यांच्या हस्ते तिरंगा झेंडा फडकविण्यात आला. यावेळी संस्थेचे पदाधिकारी इंजिनिअर इकबाल सय्यद, आर्किटेक विकार काझी, अकॅडमीक डायरेक्टर शब्बीर मोहम्मद, उपप्राचार्या फरहाना शेख आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ. सईद शेख म्हणाले, स्वातंत्र्य आपल्याला सहज मिळालेले नाही. असंख्य स्वातंत्र्य सैनिकांनी आपल्या देशासाठी संघर्ष केला, तुरुंगवास भोगला आणि अनेकांनी आपल्या प्राणांचे बलिदान दिले. स्वातंत्र्य म्हणजे केवळ परकीय सत्तेपासून मुक्ती नाही. स्वातंत्र्य म्हणजे आपल्या देशाप्रती असलेली जबाबदारीही आहे. आज आपण स्वतःला एक प्रश्न विचारला पाहिजे, देशाने आपल्याला काय दिले यापेक्षा आपण देशासाठी काय करू शकतो? आपण चांगले नागरिक बनू शकतो. आपण कायद्याचा आदर करू शकतो. आपण जात, धर्म, भाषा आणि प्रांताच्या भिंती बाजूला ठेवून एकमेकांशी बंधुभावाने वागू शकतो. आपण आपल्या परिसराची स्वच्छता राखू शकतो. आपण पर्यावरणाचे रक्षण करू शकतो. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे आपल्या मुलांना शिक्षण देऊन एक सक्षम आणि संस्कारी भारत घडवू शकतो, असे आवाहन डॉ. शेख यांनी केले.

कार्यक्रमास शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व पालक उपस्थित होते.

# आठरे पाटील पब्लिक स्कूलमध्ये स्वातंत्र्यदिन उत्साहात



आठरे पाटील पब्लिक स्कूल या इंग्रजी माध्यमाच्या वसतिगृहात्मक शाळेत स्वातंत्र्यदिन साजरा करण्यात आला.

नगर – अ.नगर शहरातील आठरे पाटील पब्लिक स्कूल या इंग्रजी माध्यमाच्या वसतिगृहात्मक शाळेत ८० वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. आंतरराष्ट्रीय लॉन टेनिसपटू संस्थेचे विश्वस्त मानसिंग आठरे पाटील हे या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. त्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी अश्वपथक, एन.सी.सी., स्काऊट व गाईड यांच्या पथकांनी कवायत संचलन करुन राष्ट्रध्वजास मानवंदना दिली. प्रमुख अतिथींचा परिचय प्राथमिकच्या मुख्याध्यापिका सौ. अनघा चेंबूरकर यांनी केला. तसेच या प्रसंगी विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतांचे समूह गायन व सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. शाळेच्या शिक्षिका सौ. कालडा सोनिया, साळवे लिना व विद्यार्थी जगताप ओंकार, पांडे धनश्री, ढगे शताक्षी व मंत्री जीविका यांनी स्वातंत्र्यदिनानिमित्त आपली मनोगतं व्यक्त केली.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी संस्थेचे विश्वस्त मानसिंग आठरे पाटील यांनी शाळेतील उपक्रम व क्रीडा प्रकारांचे कौतुक करून स्वातंत्र्यदिनाचे महत्त्व विशद केले. यावेळी प्रमुख अतिथींच्या हस्ते क्रीडा प्रकारांत उत्कृष्ट कामगिरी केलेले स्केटिंगचे खेळाडू, एन. सी. सी. चे प्रशिक्षण शिबिरात विविध स्पर्धेत सहभागी होऊन सुवर्ण व रजत पदके व प्रमाणपत्रे देऊन विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच १८ व्या अखिल भारतीय गणित विज्ञान परीक्षेत इयत्त दुसरीचा विद्यार्थी मित खरात याने देशात दुसरा व शाळेत प्रथम क्रमांक प्राप्त केला. तसेच शाळेची इयत्ता सहावीची विद्यार्थिनी कु. ढगे शताक्षी हिने देशात चौथा क्रमांक पटकावला तर यांना सुवर्ण पदके, प्रमाणपत्र व पुस्तके देऊन गौरविण्यात आले. तसेच लोकमत कॅम्पस क्लब आयोजित 'देशभक्तीपर गीत स्पर्धेत शाळेने प्रथम कमांक मिळविल्याबददल सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देण्यात आले.

या यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा डॉ. अंजली आठरे पाटील, कार्यकारी विश्वस्त डॉ. अनिल आठरे पाटील व सर्व विश्वस्त यांनी अभिनंदन केले. या स्वातंत्र्यदिन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. वाघमारे एस. एस. व सौ. घोरपडे एन. सौ. शेख टी यांनी केले. उपस्थितांचे आभार श्री. कुळधरण एम. यांनी मानले.

याप्रसंगी या कार्यक्रमासाठी मुख्याध्यापक, पर्यवेक्षिका, समन्वयक, सर्व शिक्षक–शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक उपस्थित होते. विद्यार्थ्यांना मिठाई वाटप करुन कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

# सेंट्रल बँकेतर्फे २१ ऑगस्टला नगरमध्ये मेगा रिटेल क्रेडिट आऊटरीच कार्यक्रम



**क्षेत्रिय प्रबंध नरेशकुमार दुबे**

नगर – सेंट्रल बँक ऑफ इंडिया क्षेत्रिय कार्यालय अहिल्यानगर च्या वतीने ग्राहकांच्या विविध गरजा पूर्ण करण्यासाठी त्यांना सुलभ आर्थिक मदत पुरवण्यासाठी २१ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता सवोर लॉन, नगर–मनमाड येथे मेगा रिटेल क्रेडिट आऊटरीच कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

या उपक्रमांतर्गत बँक अत्यंत कमी व्याजदर आणि आकर्षक सवलतींसह विविध रिटेल कर्जे उपलब्ध करून देणार आहे. सेंट गृह लक्ष्मी होम लोन (महिलांसाठी विशेष) व्याजदर ७ टक्के पासून सुरू परतफेडीचा कालावधी ३० वर्षांपर्यंत.सेंट होम लोन नवीन घर/प्लॉट खरेदी किंवा टेकओव्हरसाठी व्याजदर ७.२० टक्के पासून सुरू मुदत ३० वर्षांपर्यंत. सेंट गोल्ड लोन योजना ६० लाख रुपयांपर्यंत कर्ज, शून्य प्रोसेसिंग शुल्क आणि केवळ १० मिनिटांत जलद कर्ज मंजुरी. सेंट वाहन लोन व्याजदर ७.६० टक्के पासून सुरू मार्जिन १० टक्के – २० टक्के आणि परतफेड मुदत ७ वर्षांपर्यंत.

बँकेच्या या विशेष उपक्रम शिबिराच्या माध्यमातून ग्राहकांना जलद व सोपी प्रक्रिया, किमान कागदपत्रे आणि विश्वासार्ह सेवा मिळणार आहे. अधिक माहिती व कर्ज सहाय्यासाठी ग्राहक ९२२ ३९० ११११ वर मिस्ड कॉल देऊ शकतात किंवा १८०० ३० ३० या टोल–फ्री क्रमांकावर संपर्क साधावा.

नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन सेंट्रल बँक ऑफ इंडिया प्रशासनातर्फे क्षेत्रिय प्रबंध नरेशकुमार दुबे यांनी केले आहे.

# छत्तीसगडच्या धर्तीवर महाराष्ट्रातही बँकिंग क्षेत्राला रक्षाबंधन सणाची सुट्टी जाहीर करण्याची मागणी

नगर – भाऊ–बहिणीच्या पवित्र नात्याचा सण असलेल्या रक्षाबंधनानिमित्त २८ ऑगस्ट रोजी संपूर्ण महाराष्ट्रातील बँकिंग क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना छत्तीसगड राज्य शासनाच्या धर्तीवर सुट्टी जाहीर करावी, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश बँक वर्कर्स ऑर्गनायझेशनतर्फे मुख्यमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

याबाबत महाराष्ट्र प्रदेश बँक वर्कर्स ऑर्गनायझेशनने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, रक्षाबंधनाच्या दिवशी सर्व बँक कमचारी नियमित कर्तव्यावर असल्यामुळे त्यांना कुटुंबीयांसोबत हा सण साजरा करणे कठीण होते. हीच अडचण लक्षात घेता छत्तीसगड शासनाने बँक कर्मचाऱ्यांना सुट्टी जाहीर केली आहे. त्याच पद्धतीने महाराष्ट्रातही निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट्स ॲक्ट, १८८१ अन्वये रक्षाबंधनाची सुट्टी जाहीर करावी. बँकिंग क्षेत्रात महिला कर्मचाऱ्यांची संख्या लक्षणीय असून, दिवसभराचे कार्यालयीन कामकाज सांभाळताना त्यांना पारंपरिक पद्धतीने हा सण साजरा करणे अशक्य होते. नुकतेच छत्तीसगड राज्य शासनाने याच कायद्यांतर्गत रक्षाबंधनानिमित्त राज्यात सुट्टी जाहीर केली आहे. त्याच धर्तीवर महाराष्ट्रातही निर्णय घेण्याची गरज आहे.

हा निर्णय झाल्यास राज्यातील हजारो बँक कर्मचाऱ्यांना आपल्या कुटुंबीयांसोबत आनंदात सण साजरा करता येईल, असे निवेदनात म्हटले आहे.

निवेदनावर महाराष्ट्र प्रदेश बँक वर्कर्स ऑर्गनायझेशनचे अध्यक्ष गौतम कुलकर्णी, संघटनेचे महामंत्री प्रकाश नाहार यांच्या सह्या आहेत.

# महाराष्ट्राची शान आणि कुस्ती कलेचे उपासक, आंतरराष्ट्रीय कुस्तीपटू डॉ. रवींद्र कवडे

पूर्वीच्या अहमदनगरचे व आताच्या अहिल्यानगरचे आंतरराष्ट्रीय कुस्तीपटू, विश्व सुवर्णपदक विजेते कुस्तीपटू डॉ. रवींद्र रभाजीराव कवडे वयाची ८५ वर्षे आज गुरुवारी (२० ऑगस्ट) रोजी पूर्ण करीत आहेत. त्यांचा कुस्ती जीवन प्रवास नव्या कुस्तीपटूंसह सर्वच क्रीडा खेळाडूंसाठी प्रेरणादायी आहे....

महाराष्ट्राची शान आणि कुस्ती कलेचे उपासक, विश्व सुवर्णपदक विजेते कुस्तीपटू डॉ. रवींद्र आर. कवडे यांच्या चरित्राचा परिचय प्रत्येक खेळाडूने करून घेतला पाहिजे. जागतिक कुस्ती स्पर्धेतील सुवर्णपदक विजेते, कांस्यपदक विजेते, फिलाचे आंतरराष्ट्रीय पंच, आंतरराष्ट्रीय कुस्ती अकादमी संघटनेचे अध्यक्ष, मुंबईतील कांदिवली शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य अशाअनेक भूमिका त्यांनी जीवनात साकारल्या.

डॉ. रवींद्र आर. कवडे यांच्या कुटुंबात तीन भाऊ आणि दोन बहिणी आहेत. त्यांच्या वडिलांचा व्यवसाय शेतीचा होता. ते स्वतः शेतकरी होते. त्यांच्या वडिलांना कुस्तीचीही आवड होती. ते त्यांच्या काळातील एक प्रसिद्ध पैलवान होते. ते नगरच्या आनंदी बाजारातील सातपुते तालमीत प्रशिक्षणाचा सराव करत असत. हा आखाडा हिंदू–मुस्लिम ऐक्याचे प्रतीक राहिला आहे. कवडेनगरमध्ये महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेली एक नोंदणीकृत शाळा चालवली जाते, ही या भागातील सर्वात महत्त्वाची शाळा मानली जाते. येथे मुलांसाठी वीज, पाणी, खेळाचे मैदान, शौचालय आणि स्नानगृह आहे. ही शाळा एक महत्त्वाची शाळा मानली जाते. जानकी कवडेनगर येथे १० खोल्या, मुलांसाठी खेळाचे मैदान, एक ग्रंथालय आणि १० शिक्षक आहेत. श्रीमती राज कवडे या शाळेच्या संचालिका आहेत. रवींद्र आर. कवडे शाळेवर दरमहा एक लाख रुपये खर्च करतात. येथे मुलांकडून शाळेचे शुल्क आकारले जात नाही.



डॉ. रवींद्र कवडे यांनी वेटरन्स वर्ल्ड चॅम्पियनशीपमध्ये पाच वेळा भाग घेतला असून ते पदक विजेते आहेत. २००६ मध्ये त्यांनी तुर्कस्तानमधील इटली येथे झालेल्या कुल्लू वर्ल्ड रेसलिंग चॅम्पियनशीपमध्ये सुवर्णपदक जिंकले. योगेंद्र सुरेंद्र कवडे यांनी सुवर्ण आणि कांस्य पदक जिंकले. कथाकुमारी स्वप्ना वाळके यांनी कांस्य पदक जिंकले. फिलाद्वारे आयोजित महिला कुस्ती प्रकारात कांस्य पदक जिंकणारी स्वप्ना वाळके ही पहिली भारतीय महिला आहे. ही स्पर्धा ३५ ते ८० वर्षे वयोगटातील कुस्तीपटूंसाठी आयोजित केली जाते.

१९८० च्या दशकात डॉ. रवींद्र कवडे यांनी मॉस्कोमधील ऑलिम्पिकवर ऑल वर्ल्ड रेडिओवर १० मिनिटांचे भाषण दिले होते. ८ ऑगस्ट १९८० रोजी हे भाषण प्रसारित करण्यात आले, ज्यामध्ये रवींद्र कवडे यांनी कुस्तीतील अनेक मुद्द्यांवर प्रकाश टाकला. डॉ. रवींद्र कवडे यांनी कुस्तीच्या क्षेत्रात १०० हून अधिक देशांचा दौरा केला आहे. असे मानले जाते की जगात सर्वाधिक यश डॉ. रवींद्र कवडे यांच्या नावावर आहे. कुस्तीचे प्रणेते म्हणून ओळखले जाणारे, ते कुस्तीचे लेखक, प्रशिक्षक आणि प्रशिक्षक आहेत. त्यांच्याकडे प्रचंड शिक्षण, पात्रता आणि अनेक पदव्या आहेत, तसेच त्यांनी २७ पुस्तके लिहिली आहेत. १९७८ मध्ये अहमदनगर येथे भारत माल सम्राट कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते आणि चित्रपटसृष्टीत त्यांनी २००४ मध्ये हिंद केसरी या चित्रपटात काम केले. डॉ. रवींद्र कवडे या सर्व ठिकाणी यशस्वी ठरले आहेत. १९६४–१९६८–१९७२ दरम्यान ते रशियाचे तीन वेळा ऑलिम्पिक विश्वविजेते आणि ऑलिम्पिक विजेते कुस्तीपटू अलेक्झांडर मेदवेद यांना भेटले आहेत. त्यांनी मारुती माने, गणपत आंदळकर इत्यादी प्रसिद्ध कुस्तीपटूंसोबत कुस्ती खेळली आहे आणि २००६ मध्ये तुर्कीतील अंताल्या येथे ते विश्व सुवर्णपदक विजेते ठरले आहेत.

त्यांच्या संघर्षाबद्दल बोलायचे झाल्यास, १९४२ साली, रवींद्र कवडे अवघ्या २१ दिवसांचे असताना त्यांना त्यांच्या आई जानकी रभाजीराव कावडे यांच्यासह पुण्याच्या येरवडा तुरुंगात तीन महिन्यांसाठी कैद करण्यात आले होते. ब्रिटिश सरकारने त्यांच्यावर ५० रुपयांचा दंड आकारला होता. यामुळे त्यांच्या आईला आपली नोकरी सोडावी लागली होती.

डॉ.रवींद्र कवडे यांनी केवळ शिक्षण व क्रीडा क्षेत्रात स्वतःची आवड जपली नाही तर जगातील गरीब, दुःखी, दलित, शोषित, निराधार मुलांच्या विकासासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले. अमरावती येथील हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ संचलित रामकृष्ण क्रीडा विद्यालयाने १९७६ ते १९८६ पर्यंत महाराष्ट्रातील होतकरू मुलांची निवड करून त्यांना मोफत भोजन, निवास व मोफत प्रशिक्षणाची संपूर्ण व्यवस्था केली. असे कार्य करण्यामागे डॉ. रवींद्र कवडे यांचे एकमेव उद्दिष्ट होते की त्यांची आदर्श माता जानकी कवडे या थोर स्वातंत्र्यसेनानी यांनी अहमदनगरमधील नालेगावातील निराधार मुलांना त्यांच्याच घरात आश्रय देऊन सांभाळले होते व डॉ. कवडे यांनी त्यांची हीच परंपरा पुढे नेली.

डॉ. कवडे यांनी खेळाशी संबंधित २४ पुस्तके लिहिली आणि प्रकाशित केली. विधायक कार्यात दिलेल्या योगदानाबद्दल महाराष्ट्र राज्य मराठा सेवा संघ, पुणे यांच्या वतीने राष्ट्रीय अधिवेशनात डॉक्टरांचा विशेष सन्मान करण्यात आला. ते अहमदनगर जिल्हा स्वातंत्र्यसैनिक संघटनेचे सल्लागार आणि प्लॅनेटरी कमिटीचे विद्यमान अध्यक्षही आहेत. ते महाराष्ट्र राजपत्रित क्रीडा व युवक संघटनेचे अध्यक्ष होते आणि अहमदनगर येथील पेमराज सारडा महाविद्यालयात सरचिटणीस पदावर निवडून आले होते. शिक्षणाची आवड असल्याने त्यांनी आपल्या कॅम्पसमध्ये पसरलेल्या वसाहतीतील मुली व मुलांच्या शिक्षणासाठी स्वातंत्र्यसैनिक जानकी कवडे प्रशाला ही संस्था स्थापन केली आहे.

जानकी कवडे नगरातील मंदिरासाठी डॉ. रवींद्र कवडे यांनी जागा दान करून पाण्याच्या टाकीसाठी जागा दिली. डॉ.कवडे यांचे बंधू योगेंद्र सुरेंद्र कवडे यांचे पुतणे न्यायाधीश असून, भाऊ देवेंद्र व रवींद्र व भाऊ सुरेंद्र हे कुटुंबात कुस्तीगीर आहेत. डॉ. कवडे यांच्या जीवनात त्यांच्या आदर्श आई, स्वातंत्र्यसैनिक जानकी रभाजीराव कवडे आणि वडील रभाजीराव कवडे यांचे महत्त्वाचे योगदान लाभले. डॉ. कवडे आपल्या देशाच्या जडणघडणीत आपल्या आई–वडिलांचे मोठे योगदान मानतात.अहिल्यानगरचे भूषण डॉ. रवींद्र कवडे यांना जिल्ह्यातील व शहरातील कुस्तीपटू व क्रीडापटूंकडून शतायुषी होण्याच्या शुभेच्छा....

लेखन – **सौ. प्रणिता गजेंद्र कवडे**
(राष्ट्रीय योगासन पंच)

# शिष्यवृत्ती परीक्षेतील इचरजबाई फिरोदिया प्रशालेची उत्तुंग यशाची परंपरा कायम

## सर्वेश नरवाडे राज्यात अकरावा तर जिल्हा गुणवत्ता यादीत चमकले १९ विद्यार्थी

नगर – अहमदनगर एज्युकेशन सोसायटीची बाई इचरजबाई फिरोदिया प्रशालेने शिष्यवृत्ती परीक्षेतील निकालाची उज्वल परंपरा कायम राखली आहे. जिद्द, मेहनत आणि गुणवत्तेच्या जोरावर प्रशालेने पुन्हा एकदा आपल्या यशाची पताका राज्यभर फडकावली आहे. चौथीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करत शाळेच्या लौकिकात आणखी एक मानाचा तुरा खोवला. सर्वेश नरवाडे राज्यात अकरावा तर जिल्हा गुणवत्ता यादीत १९ विद्यार्थी चमकले आहेत.


अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या बाई इचरजबाई फिरोदिया प्रशालेतील शिष्यवृत्ती परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांसमवेत प्रशालेच्या मुख्याध्यापिका, शिक्षिका, शिक्षक आदी.

गेली अनेक वर्षे इचरजबाई फिरोदिया प्रशालेचे विद्यार्थी राज्य गुणवत्ता यादीत झळकत आहेत. गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि सातत्यपूर्ण मेहनतीची हीच परंपरा यंदाही कायम ठेवत विद्यार्थ्यांनी पुन्हा एकदा आपला ठसा उमटवला. या यशाचे सर्वात मोठे आकर्षण ठरला तो सर्वेश नरवाडे! सर्वेशने ३०० पैकी तब्बल २७४ गुणांची कमाई करत राज्य गुणवत्ता यादीत अकरावा क्रमांक पटकावला. त्याच्या या नेत्रदीपक यशाने शाळेचे नाव राज्याच्या गुणवंतांच्या यादीत अभिमानाने झळकले आहे. शाळेच्या यशाची ही घोडदौड केवळ राज्यापुरती मर्यादित राहिली नाही. जिल्हा गुणवत्ता यादीत तब्बल १९ विद्यार्थ्यांनी स्थान मिळवत प्रशालेचे वर्चस्व सिद्ध केले. त्यामध्ये सौमित्र महाजन (२६८ गुण ), श्लोक कवाष्टे (२६६ गुण), आरव बिदे (२५६ गुण), विश्वजीत शेळके (२४८ गुण), वीरा जाधव (२४६ गुण ), अभिनय धस (२३६ गुण), ओमकार वाकळे (२३४ गुण), प्रताप सुरपुरे (२३४ गुण), अर्पित नामदे (२३४ गुण), शुभ्रा चाळक (२३४ गुण), लोकेश रसाळ (२३० गुण), अश्विन एकलहरे (२३० गुण), शौर्य रोहोकले (२३० गुण), हर्षा बेंडाळे (२२० गुण), उदयन कोटकर (२२० गुण), सर्वम चोपडा (२१८ गुण), ईशान चौरे (२१६ गुण), हरीश्री खाडे (२१६ गुण), प्रशालेतील तब्बल २७ विद्यार्थ्यांनी २०० हून अधिक गुण मिळवत आपल्या गुणवत्तेची चुणूक दाखवली.

प्रशालेच्या मुख्याध्यापिका ज्योती सिसोदिया म्हणाल्या, विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशामागे त्यांची अथक मेहनत, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे प्रोत्साहन यांचा मोलाचा वाटा आहे. राज्यात येणे ही आमची परंपरा आहे आणि ती पुढेही अशीच सुरू राहील. या घवघवीत यशाबद्दल संस्थेच्या प्रमुख कार्यवाह सन्माननीय छायाताई फिरोदिया, सहकार्यवाह गौरव फिरोदिया, खजिनदार प्रकाश गांधी, सर्व सन्माननीय पदाधिकारी, प्रशालेच्या मुख्याध्यापिका ज्योती सिसोदिया यांनी अभिनंदन केले.

या विद्यार्थ्यांना मुख्याध्यापिका ज्योती सिसोदिया, सविता शेळके, शकुंतला देसर्डा, पराग विलायते, वैशाली निकम, वैभव वाघ, कांचन नेहुल, कांतिलाल खुरंगे, आशा मांढरे व प्रशालेतील इतर सर्व शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

# भाजपच्या भटके-विमुक्त प्रकोष्ठाच्या राज्य समितीवर तुषार पोटे यांची निवड



नगर – भारतीय जनता पार्टीच्या भटके–विमुक्त प्रकोष्ठाच्या राज्य समितीवर सहसंयोजकपदी अहिल्यानगरचे तुषार पोटे यांची निवड करण्यात आली आहे. राज्य समितीच्या अध्यक्ष नरेंद्र पवार यांनी त्यांच्या नियुक्तीची घोषणा केली. या निवडीमुळे अहिल्यानगर जिल्ह्यातील भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांकडून पोटे यांचे अभिनंदन केले जात आहे.

तुषार पोटे गेल्या २५ वर्षांपासून भारतीय जनता पार्टीचे निष्ठावान कार्यकर्ते म्हणून कार्यरत आहेत. पक्षाच्या विविध संघटनात्मक जबाबदाऱ्या सांभाळताना त्यांनी अहिल्यानगर जिल्ह्यासह राज्यभर पक्षविस्तारासाठी सातत्याने काम केले आहे. २००९ मध्ये भाजप युवा मोर्चाच्या कार्यकारिणी चिटणीसपदाची जबाबदारी त्यांनी सांभाळली. त्यानंतर २०१३ मध्ये युवा मोर्चाचे सरचिटणीस, २०१६ मध्ये युवा मोर्चाचे प्रदेश कोषाध्यक्ष, तर २०२० मध्ये भाजप शहर जिल्हा सरचिटणीस म्हणून त्यांनी काम केले.

त्यानंतर २०२३ मध्ये भटके–विमुक्त मोर्चाच्या प्रदेश उपाध्यक्षपदाची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली. २०२६ मध्ये प्रदेश सरचिटणीस तथा सहसंयोजक म्हणून त्यांनी भटके–विमुक्त समाजाच्या विविध प्रश्नांसाठी आणि पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी काम केले. आता राज्य समितीवर सहसंयोजक म्हणून झालेली निवड ही त्यांच्या प्रदीर्घ संघटनात्मक कार्याची दखल मानली जात आहे.

लोकसभा, विधानसभा तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये पक्षाची भूमिका आणि विचारधारा तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी पोटे यांनी सातत्याने प्रयत्न केले. भटके–विमुक्त समाजातील कार्यकर्ते व नागरिकांशी संपर्क वाढवून त्यांना पक्षाच्या प्रवाहात आणण्यासाठीही त्यांनी संघटनात्मक पातळीवर काम केले आहे.

पोटे यांच्या निवडीबद्दल विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, भाजप शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, नगर दक्षिण जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, नगर उत्तर जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, पाथर्डीच्या आमदार मोनिका राजळे यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मित्रपरिवाराने त्यांचे अभिनंदन केले.

# फिरोदिया शिवाजियन्स आंतरशालेय फुटबॉल स्पर्धेच्या अंतिम सामन्यांचा २१ व २२ ऑगस्टला रंगणार थरार

नगर – फिरोदिया शिवाजियन्स अकॅडमीच्या वतीने आयोजित आठव्या आंतरशालेय फुटबॉल स्पर्धेतील विविध गटांतील अंतिम तसेच तिसऱ्या क्रमांकासाठीचे सामने २१ व २२ ऑगस्ट रोजी अहमदनगर महाविद्यालयाच्या मैदानावर रंगणार आहेत.

या स्पर्धेत १२ वर्षांखालील मुले, १४ वर्षांखालील मुले, १६ वर्षांखालील मुले तसेच १६ वर्षांखालील मुली अशा चार गटांमध्ये सामने खेळविण्यात आले. विविध शाळांच्या संघांनी सुरुवातीपासूनच उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत अंतिम फेरीत धडक मारली आहे. त्यामुळे प्रत्येक गटातील अंतिम सामना चुरशीचा आणि रंगतदार होण्याची शक्यता आहे. २१ ऑगस्ट रोजी विविध गटांतील तिसऱ्या क्रमांकासाठीचे सामने खेळविण्यात येणार आहेत. १६ वर्षांखालील मुलींच्या गटात श्रीसाई इंग्लिश मीडियम स्कूल आणि पोदार इंटरनॅशनल स्कूल यांच्यात सामना होणार आहे. दोन्ही संघांतील खेळाडू तिसरे स्थान मिळविण्यासाठी सर्वस्व पणाला लावतील. १२ वर्षांखालील मुलांच्या गटात प्रवरा पब्लिक स्कूल आणि आयकॉन पब्लिक स्कूल यांच्यात तिसऱ्या क्रमांकासाठी लढत होणार आहे. तर १४ वर्षांखालील मुलांच्या गटात आठरे पाटील पब्लिक स्कूल आणि आर्मी पब्लिक स्कूल यांच्यात सामना होणार आहे.

२२ ऑगस्ट हा स्पर्धेतील सर्वात महत्त्वाचा दिवस ठरणार असून, चारही गटांतील अंतिम सामने याच दिवशी खेळविण्यात येणार आहेत. १६ वर्षांखालील मुलींच्या गटात आर्मी पब्लिक स्कूल विरुद्ध प्रवरा पब्लिक स्कूल यांच्यात अंतिम सामना होणार आहे. मागील वर्षी प्रवरा पब्लिक स्कूलने या गटाचे विजेतेपद पटकाविले होते. यंदाही प्रवरा पब्लिक स्कूलने अंतिम फेरी गाठत आपले विजेतेपद कायम राखण्यासाठी सज्ज आहे.

दुसरीकडे आर्मी पब्लिक स्कूलचा संघही संपूर्ण स्पर्धेत दमदार कामगिरी करत अंतिम फेरीत पोहोचला आहे. त्यामुळे मुलींच्या गटातील हा अंतिम सामना अत्यंत चुरशीचा ठरण्याची शक्यता आहे. १२ वर्षांखालील मुलांच्या गटात आठरे पाटील स्कूल विरुद्ध सेंट मायकल स्कूल यांच्यात विजेतेपदासाठी सामना होणार आहे. मागील वर्षी आठरे पाटील स्कूलने विजेतेपद मिळविले होते.

यंदा या संघासमोर सध्या उत्कृष्ट फॉर्ममध्ये असलेल्या सेंट मायकल स्कूलचे आव्हान असणार आहे. १४ वर्षांखालील मुलांच्या गटात प्रवरा पब्लिक स्कूल विरुद्ध सेंट मायकल स्कूल असा अंतिम सामना रंगणार आहे. १६ वर्षांखालील मुलांच्या गटात सेक्रेड हार्ट कॉन्व्हेंट स्कूल विरुद्ध आर्मी पब्लिक स्कूल असा विजेतेपदाचा सामना होणार आहे. या गटातील तिसऱ्या क्रमांकासाठी आठरे पाटील स्कूल आणि प्रवरा पब्लिक स्कूल यांच्यात सामना होणार आहे.

# शिंगवी ज्वेलर्समध्ये नगर जिल्ह्यात प्रथमच लॅब ग्रोन डायमंडच्या रूप ब्रॅण्डचे अनावरण

नगर – तब्बल ६७ वर्षांची विश्वसनीय सुवर्ण परंपरा असलेल्या शिंगवी ज्वेलर्स प्रा.लि. ने रूप हा आंतरराष्ट्रीय दर्जाचा लॅब ग्रोन डायमंडचा अहिल्यानगर शहर व जिल्ह्यातील पहिला ब्रॅण्ड नुकताच लॉन्च केला आहे. या ब्रॅण्डचे अनावरण प्रोफेसर कॉलनी चौकातील शिंगवी ज्वेलर्स प्रा.लि. च्या शोरूममध्ये धनश्री सुजय विखे पाटील यांच्या हस्ते झाले.



शिंगवी ज्वेलर्सच्या रूप या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या लॅब ग्रोन डायमंडचे अनावरण करताना धनश्री विखे पाटील. समवेत मनिषा गुगळे, देविका देशमुख, मधुबाला चोरडिया, डॉ. कल्याणी पवार, सुवालाल शिंगवी, संजय शिंगवी, श्रेणिक शिंगवी, गुंजन शिंगवी, लौकिक शिंगवी आदी.

याप्रसंगी जिजाऊ ग्रुपच्या मनिषा गुगळे, गॅलॅक्सी इंटरनॅशनल स्कूलच्या संचालिका देविका देशमुख, मस्तानी ब्रॅण्डच्या संस्थापक मधुबाला चोरडिया, स्वस्तिक हॉस्पिटलच्या डॉ. कल्याणी पवार, सुवालाल शिंगवी, संजय शिंगवी, श्रेणिक शिंगवी, गुंजन शिंगवी, लौकिक शिंगवी आदी उपस्थित होते.

धनश्री विखे पाटील म्हणाल्या, अहिल्यानगरची सोन्याची बाजारपेठ राज्यात प्रसिद्ध आहे. शिंगवी ज्वेलर्स प्रा. लि. ६७ वर्षांपासून ग्राहकांना सोन्यासारखी सेवा देत आहे. ग्राहकांची मौल्यवान खरेदी संस्मरणीय करण्यावर त्यांचा भर असतो. सुवर्ण विश्वात अनेक पथदर्शी पायंडे पाडताना आता जागतिक दर्जाचा डायमंडचा ब्रँण्डही त्यांनी नगरकरांना प्रथमच उपलब्ध करून दिला आहे. आताच्या काळात डायमंड खरेदीकडे ग्राहकांचा कल वाढला आहे. त्यांना शिंगवी ज्वेलर्स प्रा. लि. येथे विश्वासाने लॅब ग्रोन डायमंड खरेदी करता येत आहे.

यावेळी गुंजन शिंगवी यांनी सांगितले की, शिंगवी ज्वेलर्स प्रा. लि. ला ग्राहकांनी नेहमीच भरभरून प्रेम दिले आहे. सुवर्ण व्यवसाय करताना आम्ही नगरमधील पहिले वातानुकूलित सुवर्ण दालन केले. ज्वेलरी शोरूममध्ये महिला सेल्समनही आमच्याच दालनात प्रथम आल्या. मी स्वतः जिल्ह्यातील पहिला डायमंड पदवीधर आहे. आता जागतिक दर्जाचा लॅब ग्रोन डायमंडचा रूप ब्रॅण्डही नगर जिल्ह्यात प्रथमच आमच्या दालनात उपलब्ध करून दिला आहे. हे डायमंड खाणीतून नाही तर लॅबमध्ये तयार केले जातात. जे गुणवत्तेला आणि दिसायला हुबेहूब असतात. लॅबमधील डायमंड नैसर्गिक डायमंड इतकेच चमकदार व रेखीव असतात. ग्राहकांना आपल्या पसंतीनुसार निवांत वातावरणात आमच्या दालनात डायमंड खरेदी करता येईल. शेवटी श्रेणिक शिंगवी यांनी आभार मानले.

# सौ. मीनल बोरा यांच्या २१ उपवासांची पच्चक्खाण विधी संपन्न

नगर – आचार्य सम्राट प. पू. आनंद ऋषिजी म. सा. यांच्या जन्मोत्सवानिमित्त तपस्येचा संकल्प करीत सौ. मीनल ईश्वर बोरा यांनी केलेल्या २१ निरंकार उपवासांच्या अखंड तपश्चर्येची पच्चक्खाण विधी आनंद तीर्थ समवशरण येथे अत्यंत भक्तिमय व आध्यात्मिक वातावरणात संपन्न झाली.


सौ. मीनल ईश्वर बोरा यांनी केलेल्या २१ निरंकार उपवासांच्या अखंड तपश्चर्येची पच्चक्खाण विधी आनंद तीर्थ समवशरण येथे संपन्न झाली.

ही पावन पच्चक्खाण विधी उपाध्याय प्रवर प. पू. प्रवीण ऋषिजी म. सा. यांच्या मुखारविंदातून संपन्न झाली. यावेळी मधुर कंठी प. पू. तीर्थेश ऋषिजी म. सा. यांचीही मंगलमय प्रेरणा लाभली, तर महाराष्ट्र प्रवर्तक प. पू. कुंदन ऋषिजी म. सा. यांच्या कृपाशीर्वादाने ही कठोर तपस्या पूर्णत्वास गेली.

समर्पण चातुर्मास समितीचे अध्यक्ष अशोक बोरा यांच्या पुत्रवधू असलेल्या सौ. मीनल ईश्वर बोरा यांनी गुरुभक्ती, श्रद्धा, संयम आणि आत्मशुद्धीची भावना मनात ठेवून ही २१ उपवासांची कठोर साधना पूर्ण केली.

यावेळी उपाध्याय प्रवर परम पूज्य श्री प्रवीण ऋषिजी महाराज साहेब यांनी मीनलजींच्या तपस्येचे विशेष कौतुक करत, ही तपस्या केवळ अन्न–पाण्याचा त्याग नसून मन, इंद्रिये आणि भावनांवर संयम ठेवत आत्मशुद्धीच्या दिशेने केलेली साधना असल्याचे सांगितले. श्रद्धा, धैर्य, सहनशीलता आणि दृढ संकल्प यांच्या बळावर त्यांनी २१ उपवास पूर्ण करून इतरांसमोरही तप–संयमाचा प्रेरणादायी आदर्श ठेवला आहे, अशा भावना गुरुदेवांनी व्यक्त केल्या.

तपस्या ही शरीराला कष्ट देण्यासाठी नसून आत्म्याला निर्मळ करण्यासाठी असते. श्रद्धेने केलेली तपस्या जीवनाला अंतर्मुख करते आणि आत्मकल्याणाच्या मार्गावर पुढे घेऊन जाते, या भावनेतून गुरुदेवांनी मीनलजींच्या तपश्चर्येचे अभिनंदन व अनुमोदना केली. २१ दिवसांच्या या कठोर तपश्चर्येदरम्यान संयम, श्रद्धा, सहनशीलता आणि गुरुभक्तीचा परिचय देणाऱ्या सौ. मीनल ईश्वर बोरा यांच्या या तपस्येची उपस्थित भाविकांनी मनःपूर्वक अनुमोदना केली.

समर्पण चातुर्मास समितीचे ट्रस्टी अनिल पोखरणा, मनसुख गुंदेचा, आदेश चंगेडिया, विलास कटारिया, राजेश भंडारी, विजय गुगळे, सुरेश कांकरिया, राजेंद्र बोरा व अभय गांधी यांनी यावेळी मीनल ईश्वर बोरा यांचा सन्मान केला तर प्रमुख लाभार्थी सौरभ प्रमिलाबाई हेमराज बोरा यांच्या द्वारे तपस्वींना परम पूज्य आनंदऋषिजी म. सा. यांच्या पदचिन्हांचे अंकन असलेल्या चांदीच्या नाण्यांचे वितरण करून त्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी रतिलाल पटवा, रसिक पटवा, अजित बोरा, किशोर गांधी, एड. अमृत मुथा, अरविंद गुंदेचा, संजय ताथेड, संतोष पिपाडा, अशोक शिंगवी, महेश गुंदेचा, महेश गुगळे आदी उपस्थित होते.

# विश्वविजेता कुमार शेजळ साहिल नगरमध्ये एकाच वेळी खेळणार २० खेळाडूंविरुद्ध

## २३ ऑगस्टला अहिल्यानगर रॅपिड बुद्धिबळ स्पर्धेचे उद्घाटन



नगर – घंगेकर चेस अकॅडमीच्यावतीने आयोजित जी. एच. रायसोनी मेमोरियल अहिल्यानगर रॅपिड बुद्धिबळ स्पर्धेचे उद्घाटन २३ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता सावेडीतील पाईपलाईन रोडवरील मोरया मंगल कार्यालयात होणार आहे. या स्पर्धेच्या उद्घाटन सोहळ्यास जागतिक रॅपिड अँड ब्लिट्झ चॅम्पियनशिप स्पर्धेतील विजेता राष्ट्रीय बुद्धिबळपटू कुमार शेजळ साहिल (वय २१) यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. या स्पर्धेत साहिल हे एकाच वेळी २० खेळाडूंविरुद्ध बुद्धिबळ सामना खेळणार आहेत.

नायजेरियातील अबुजा येथे ७ ऑगस्ट रोजी संपलेल्या जागतिक रॅपिड अँड ब्लिट्झ चॅम्पियनशिप स्पर्धेत विजेतेपद मिळविलेल्या कुमार शेजळ साहिल यांच्यासोबत अहिल्यानगरमधील बुद्धिबळप्रेमींना प्रत्यक्ष खेळण्याची अनोखी संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. साहिल हे एकाच वेळी २० खेळाडूंविरुद्ध सायमलटेनिअस बुद्धिबळ सामना खेळणार आहेत.

या एकदिवसीय रॅपिड बुद्धिबळ स्पर्धेत विविध वयोगटांसाठी सामने आयोजित करण्यात आले आहेत. ७ वर्षांखालील, ९ वर्षांखालील, १४ वर्षांखालील, १९ वर्षांखालील, खुला तसेच महिला गट अशा विविध गटांचा समावेश असून विजेत्यांना रोख पारितोषिकांसह करंडक देण्यात येणार आहेत. स्पर्धेसाठी सुमारे ४७ हजार ५०० रुपयांची बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. स्पर्धेला रायसोनी फाउंडेशन तसेच कल्पना प्रकाश वेल्फेअर फाउंडेशन, नागपूर यांचे सहकार्य लाभले आहे. विश्वविजेत्या बुद्धिबळपटूसोबत खेळण्याची आणि त्यांचा खेळ प्रत्यक्ष पाहण्याची संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल घंगेकर चेस अकॅडमीचे कौतुक होत आहे. याबाबतची माहिती घंगेकर चेस ॲकडमीचे प्रशांत घंगेकर यांनी दिली. कुमार शेजळ साहिल यांच्यासोबत सायमलटेनिअस सामना खेळण्यासाठी पूर्वनोंदणी आवश्यक असून इच्छुकांनी मनीष जसवाणी यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी व नावनोंदणीसाठी प्रशांत घंगेकर– ९९२१३७७९८८, मनीष जसवाणी– ८८५५००२३३२, देवेंद्र ढोकळे– ९५११६५६०६३ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# आडसूळ एज्युकेशनल कॅम्पसचा प्रेरणादायी प्रवास हजारो विद्यार्थ्यांचे भविष्य घडविणारा ज्ञानाचा वटवृक्ष

स्वप्न मोठे असले की परिस्थिती कधीच आडवी येत नाही. जिद्द, मेहनत आणि शिक्षणावरील निस्सीम प्रेम असेल, तर अवघ्या दोन विद्यार्थ्यांपासून सुरू झालेला प्रवासही हजारो विद्यार्थ्यांच्या भविष्याला उजाळा देणारा ज्ञानाचा वटवृक्ष बनू शकतो. या विचारांचे जिवंत उदाहरण म्हणजे प्रा. डॉ. अनिरुद्ध आडसूळ आणि सौ. लीना आडसूळ यांनी उभारलेला आडसूळ एज्युकेशनल कॅम्पस होय.

शिक्षणाची प्रचंड आवड, विद्यार्थ्यांप्रती असलेली आत्मीयता आणि समाजासाठी काहीतरी वेगळे करण्याची तळमळ या भावनेतून १३ जून १९९१ रोजी अहिल्यानगर येथे प्रा. डॉ. अनिरुद्ध आडसूळ यांनी अवघ्या दोन विद्यार्थ्यांना घरी जाऊन शिकवण्यास सुरुवात केली. ज्ञानदानाचा हा छोटासा दीप पुढे हजारो विद्यार्थ्यांच्या आयुष्यात प्रकाश निर्माण करणारा दीपस्तंभ ठरला. विद्यार्थ्यांचा वाढता प्रतिसाद पाहून त्यांनी आडसूळ कोचिंग क्लासेसची स्थापना केली आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा पाया रचला. सन १९९५ मध्ये त्यांचा विवाह सौ. लीना आडसूळ यांच्याशी झाला. संसाराची जबाबदारी सांभाळत त्यांनी स्वत:चे शिक्षण पूर्ण केले आणि त्यानंतर कोचिंग क्लासेसच्या प्रत्येक टप्प्यावर प्रा. आडसूळ यांच्या खांद्याला खांदा लावून काम केले. त्यांच्या सहकार्यामुळे संस्था अधिक सक्षम होत गेली. दोघांच्या कष्ट, प्रामाणिकपणा आणि विद्यार्थ्यांच्या प्रेमामुळे आडसूळ कोचिंग क्लासेसने यशाची नवी उंची गाठली. सीईटीच्या माध्यमातून या क्लासेसमधून हजारो विद्यार्थी डॉक्टर, अभियंते आणि विविध क्षेत्रांतील यशस्वी व्यावसायिक बनले. अनेक विद्यार्थ्यांनी देश–विदेशात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला. विद्यार्थ्यांच्या यशातूनच या संस्थेची खरी ओळख निर्माण झाली.



यशाची घोडदौड सुरू असतानाच नियतीने कठीण परीक्षा घेतली. २००५ मध्ये प्रा. अनिरुद्ध आडसूळ यांना दोन्ही पायांच्या हिप जॉइंटचा गंभीर त्रास सुरू झाला. मात्र संकटांसमोर न झुकता त्यांनी अपार जिद्द, धैर्य आणि आत्मविश्वासाच्या जोरावर वाटचाल सुरूच ठेवली. याच काळात त्यांनी साकेश्वर ग्रामीण विकास सेवा संस्थेची स्थापना केली. स्थापनेपासून आजतागायत ते संस्थेचे अध्यक्ष, तर सौ. लीना आडसूळ सचिव म्हणून अत्यंत समर्पणाने कार्यरत आहेत. समाजाला दर्जात्मक उच्च शिक्षण उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने संस्थेने शिक्षण क्षेत्रात मोठा विस्तार केला. २००८ मध्ये अहिल्यानगर शहरात सौ. सुनंदाबाई माणिक आडसूळ कॉलेज आणि श्री माणिक शंकर आडसूळ बी.एड. कॉलेज सुरू करण्यात आले. त्यानंतर चास (अहिल्यानगर) येथील ६० एकर विस्तीर्ण परिसरात आधुनिक शैक्षणिक संकुल उभारण्यात आले.


प्रा. डॉ. अनिरुद्ध आडसूळ


सौ. लीना आडसूळ

विविध शैक्षणिक संस्था सुरू करण्यात आल्या. आज या कॅम्पसमध्ये सुमारे आठ हजार विद्यार्थी उच्च शिक्षण घेत आहेत. आतापर्यंत चार हजारांहून अधिक विद्यार्थ्यांची विविध नामांकित कंपन्यांमध्ये निवड झाली असून अनेक विद्यार्थ्यांनी स्वत:चे उद्योग–व्यवसाय उभे केले आहेत. त्यामुळे आडसूळ एज्युकेशनल कॅम्पस हा केवळ शिक्षण देणारा परिसर नसून रोजगारनिर्मिती आणि उद्योजक घडवणारे केंद्र म्हणूनही ओळखला जात आहे.

उच्च शिक्षित व अनुभवी प्राध्यापकवर्ग, अत्याधुनिक प्रयोगशाळा, स्मार्ट क्लासरूम, डिजिटल ग्रंथालय, कौशल्यधारित शिक्षण, प्रभावी मेंटर–मेंटी प्रणाली, उद्योग प्रशिक्षण, इंटर्नशिप, नियमित कॅम्पस प्लेसमेंट, सीसी टीव्हीची सुरक्षा, स्वतंत्र वसतिगृहे, बस सुविधा, क्रीडा व सांस्कृतिक उपक्रम आणि स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन यांमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधला जातो. राबवण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांमुळे आडसूळ कॅम्पस विद्यार्थ्यांची पहिली पसंती ठरत आहे. अनेक विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरीय, राज्यस्तरीय आणि राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्येही उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

शिक्षणाची आवड, अथक कष्ट, संकटांवर मात करण्याची जिद्द आणि समाजासाठी काहीतरी भरीव करण्याची तळमळ या चार मूल्यांच्या बळावर प्रा. अनिरुद्ध आडसूळ आणि सौ. लीना आडसूळ यांनी उभारलेला हा ज्ञानाचा महावृक्ष आज हजारो विद्यार्थ्यांच्या आयुष्याला नवी दिशा देत आहे. दोन विद्यार्थ्यांपासून सुरू झालेला हा प्रवास आज हजारो कुटुंबांच्या स्वप्नांना आकार देणारा, ग्रामीण भागातील शिक्षणक्रांतीचा प्रेरणादायी इतिहास बनला आहे. आडसूळ एज्युकेशनल कॅम्पस हा केवळ एक शैक्षणिक परिसर नाही, तर शिक्षणातून समाज परिवर्तन या विचाराचा साकार झालेला आदर्श आहे.

### प्राप्त मानांकन व प्रतिष्ठित पुरस्कार

गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि सातत्यपूर्ण उत्कृष्ट कामगिरीमुळे संस्थेला नॅक व एनबीए मानांकन प्राप्त झाले आहे. कॅम्पसमधील सर्व महाविद्यालयांचे निकाल सातत्याने उत्कृष्ट राहिले असून विद्यार्थ्यांच्या यशस्वी वाटचालीमुळे संस्थेच्या लौकिकात अधिक भर पडली आहे. याच कार्याची दखल घेत संस्थेला अनेक राष्ट्रीय व राज्यस्तरीय पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा ग्रामीण भागातील सर्वोत्कृष्ट टेक्निकल कॅम्पस पुरस्कार (२०२६), मुंबई येथे महाराष्ट्रातील उत्कृष्ट कॅम्पस पुरस्कार (२०२५), बंगळुरू येथे भारतातील प्रतिष्ठित कॉलेजचा राष्ट्रीय पुरस्कार (२०२५),

### आडसूळ एज्युकेशनल कॅम्पसअंतर्गत शैक्षणिक संस्था

आडसूळ एज्युकेशनल कॅम्पसअंतर्गत सौ. सुनंदाबाई माणिक आडसूळ कॉलेज (२००८), श्री माणिक शंकर आडसूळ बी.एड. कॉलेज (२००८), सुंदरबाई माणिक आडसूळ पॉलिटेक्निक कॉलेज (२०१०), आडसूळ टेक्निकल कॅम्पस – इंजिनिअरिंग (बी.ई., एम. ई.), एमबीए, एमसीए (२०१२), आडसूळ कॉलेज ऑफ फार्मसी (बी.फार्म. / डी.फार्म. –२०२३), साकेश्वर कॉलेज ऑफ फार्मसी (२०२३), आडसूळ लॉ कॉलेज (२०२४), आडसूळ आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज (२०२४), आडसूळ कॉम्प्युटर अँड मॅनेजमेंट कॉलेज (बीबीए, बीसीए, एमबीए, एमसीए) (२०२४), आडसूळ आर्किटेक्चर कॉलेज (२०२५) या शैक्षणिक संस्था कार्यरत आहेत.

# धम्माल मनोरंजन

## सुविचार




''पुस्तकाची किमत रत्नापेक्षाही अधिक आहे.''

## दिनविशेष २१ ऑगस्ट

१९०५ : बिपीन गुप्ता भारतीय अभिनेते आणि निर्माते यांचा . जन्म. (मृत्यू : ९ सप्टेंबर १९८१)
१९०७ : पी. जीवनवंश भारतीय वकील आणि राजकारणी यांचा जन्म. (मृत्यू : १८ जानेवारी १९६५)
१९०९ : नागोराव घन :श्याम देशपांडे कवी यांचा जन्म. (मृत्यू : १० मे २०००)
१९१० : नारायण बेन्द्रे जगप्रसिद्ध चित्रकार यांचा जन्म. (मृत्यू : १८ फेब्रुवारी १९९२)
१९२४ : श्रीपाद दाभोळकर गणितज्ञ आणि कृषीशास्त्रज्ञ यांचा जन्म. (मृत्यू : ३० एप्रिल २००१)
१९३४ : सुधाकरराव नाईकफ महाराष्ट्राचे १३वे मुख्यमंत्री यांचा जन्म. (मृत्यू : १० मे २००१)१९३९ : फेस्टस मोगेफ बोत्स्वानाचा राष्ट्राध्यक्ष यांचा जन्म. १९६१ : ङ्व्ही. बी. चन्द्रशेखरफ भारताचा फिरकी गोलंदाज यांचा जन्म.१९६३ : मोहम्मद (सहावा) मोरोक्कोचा राजा यांचा जन्म.१९७३ : सर्गेइ ब्रिनफ गूगल चे सहसंस्थापक यांचा जन्म.१९८१ : कॅमेरॉन विंकल्वॉसफ कनेक्ट्यू चे सहसंस्थापक यांचा जन्म.१९८६ : उसेन बोल्ट जमैकाचा धावपटू यांचा जन्म.१९३१ : पं. विष्णू दिगंबर पलुसकर संगीतज्ञ, गायक, संगीतप्रसारक आणि गांधर्व महाविद्यालयाचे संस्थापक गायनाचार्य यांचे निधन. (जन्म : १८ ऑगस्ट १८७२)
१९४० : लिऑन ट्रॉट्स्की रशियन क्रांतिकारक यांचे निधन. (जन्म : ७ नोव्हेंबर १८७९)
१९४७ : इटोर बुगाटीफ बुगाटी कंपनी चे संस्थापक यांचे निधन. (जन्म : १५ सप्टेंबर १८८१)
१९७६ : पांडुरंग नाईक प्रसिद्ध सिनेमॅटोग्राफर यांचे निधन. (जन्म : १३ डिसेंबर १८९९)१९७८ : विनू मांकड भारतीय क्रिकेट खेळाडू याचं निधन. (जन्म : १२ एप्रिल १९१७)
१९८१ : काकासाहेब कालेलकर गांधीवादी देशभक्त, शिक्षणतज्ञ याचं निधन. (जन्म : १ डिसेंबर १८८५ सातारा, महाराष्ट्र)१९९१ : गोपीनाथ मोहंती ज्ञानपीठ पारितोषिक विजेते ओरिया साहित्यिक यांचे निधन. (जन्म : २० एप्रिल १९१४)१९९५ : सुब्रमण्यन चंद्रशेखर नौबल पारितोषिक विजेते वैज्ञानिक यांचे निधन. (जन्म : १९ ऑक्टोबर १९१०)२००० : निर्मला गांधी समाजसेविका, महात्मा गांधींच्या स्नुषा यांचे निधन
२००० : विनायकराव कुलकर्णी स्वातंत्र्यलडःयातील व गोवा मुक्तीसंग्रामातील प्रमुख सेनानी आणि समाजवादी विचारवंत यांचे निधन.
२००१ : शरद तळवलकर मराठी रंगभूमी चित्रपट हास्य अभिनेते यांचे निधन. (जन्म : १ नोव्हेंबर १९२१)
२००१ : शं. ना. अंधृटकर मराठी रंगभूमीचा वारकरी म्हणून गौरविले गेलेले यांचे निधन.
२००६ : बिस्मिला खान भारतरत्न ख्यातनाम सनईवादक यांचे निधन. (जन्म : २१ मार्च १९१६)

## महाशब्दकोडे



### आडवे संकेत

१) आमिर खान, सलमान खान यांचा एक चित्रपट
८) पांढरा ढोंगी साधू
१०) कोठीवर नाचणारी
११) एका पक्षाचे नाव
१२) वाजणे, बोलणे
१४) xxx खडी तुझ्या लावी वेडमला.....
१५) समेट
१७) इंदिरा गांधीचा वीस सुत्री कार्यक्रम
१९) लक्ष्मी
२०) त्रास
२२) संबंध (हिं.)
२३) वाहण्याची जमीन
२५) तलाठी
२७) खट आवाज करुन
२८) धरती
३०) नाताचा पुत्र
३१) आरी
३२) सनदशीर
३५) येण्याचा शब्द, आवक
३७) गमणे, मौजेणे वेळ जाणे
३८) रात्र ३९) चक्षु
४०) फिक्स होणे
४१) राक्षस, दैत्य
४३) झरा, दयातार्थ
४४) नीरव, शांत
४६) एक महाकाय वृक्ष
४७) दंड, शासन
४८) भट्टी
४९) छोट्या पडद्यावरची माधूरी
५२) शुद्ध
५३) फेकून देण्याजोगे, टाकाऊ

### उभे संकेत

१) शेवट
२) एक हिंदी चित्रपट
३) पराजयच्या विरुद्ध
४) काबुल या देशाची राजधानी आहे
५) विरोधास न जुमानता काम करणे
६) बारा महिने चाकरी घेऊन अकरा महिन्याचा पगार घेण्याची पद्धत
७) अपशकून
८) पू
९) गणपती
१३) पस्तावा
१६) तोंडोतोंडी येणे
१७) स्थुल नकाशा, कच्चा कागद
१८) किरकोळ
२१) गोंधळणे
२४) पेज, कांजी
२६) रंग, जिन्नस
२९) एक संख्या
३३) पात्रापात्रभाव
३४) वेळेचे गांभीर्य लक्षात घेणारा
३५) अपेक्षा
३६) जकार्ता या देशाची राजधानी आहे
३८) निवडण्याची पद्धत
४२) xxx सगळे गाढव (चित्रपट)
४३) एक साधू
४५) मरण्याची स्थिती
५०) एक पारदर्शक वस्तू
५१) मंडई, बाजार, रांग, ओळ

### मागील उत्तर

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सा | त्वि | क | ■ | ■ | त | ळ | प | ■ | वं | द | नी | य |
| रं | ■ | च | त | को | र | ■ | व | न | दे | व | ता | ■ |
| गी | त | रा | मा | य | ण | ■ | मा | ■ | मा | ■ | ■ | ज |
| ■ | ■ | का | ■ | ता | प | मा | न | ■ | त | ■ | ज | वा |
| ता | ग | डी | ■ | ■ | टु | र | ■ | आ | र | स | पा | नी |
| रा | ज | ■ | वा | न | ■ | ■ | ड | ग | म | ■ | न | दी |
| धी | र | ध | री | रे | धी | रा | पो | टी | ■ | ब | ■ | वा |
| श | ■ | पा | रा | श | र | ■ | ष | ■ | दा | दा | मु | नी |
| ■ | पो | टा | शी | ■ | ज | ड | ण | ■ | स | म | ज | ■ |
| य | ती | ■ | ■ | न | कु | ल | ■ | ■ | रा | ■ | रा | त्र |
| म | ■ | अ | ■ | र | मा | ■ | अ | प | मा | न | ■ | स्त |
| रा | जें | द्र | कु | मा | र | ■ | ज | ग | चा | ल | क | ■ |
| ज | ■ | क | ल | ई | ■ | अ | ब | ला | ■ | ■ | धी | र |




१) कांच ही खालीलप्रमाणे कशी आहे?
अ)दुर्वाहक ब)मंदवाहक क)सुवाहक ड)संवाहक
२) पावसाळ्यात विजा चमकण्यामुळे कशाचे ऑक्सीडीकरण घडून येते?
अ)अमोनिया ब)नायट्रोजन क)कार्बन ड)हायड्रोजन
३) सौर ऊर्जा कोणत्या स्वरुपात असते?
अ)गॅमा प्रारणे ब)प्रकाश प्रारणे
क)विद्युत चुंबकीय प्रारणे ड) अल्फा प्रारणे
४) गुरुत्वीय त्वरणाचे सर्वात जास्त मुल्य कोठे असते?
अ)ध्रुवांवर ब)महासागराजवळ
क)पृथ्वीच्या केंद्राच्या दिशेस ड) विषुववृत्तांवर
५) साबणांवर कोणत्या गोष्टीवर अनिष्ट परिणाम होतो?
अ)आम्लता ब)फ्लोरिन क)क्षारता ड)सोडियम क्षार
६) कोणता धातू कक्षा तापमानास द्रवरुप असतो?
अ)ग्रॅफाईट ब)अल्कहोल क) पारा ड)ब्रोमीन
७) नेत्रभिंग आणि दृष्टिपटल यामधील अंतर कशाच्या आकारावर अवलंबून असते?
अ)नेत्रगोल ब)अंधबिंदू क)बाहुली ड)पारपटल
८) गतिमान पदार्थाच्या गतीला विरोध करणाऱ्या बलास काय म्हणतात?
अ)गतीय बल ब)विरोधी बल क)त्वरण बल ड)घर्षण बल
९) गजाननरावनी आपल्या मळ्यात १/३ भागात उस लावला, १/४ भागात भुईमुंग लावला व उरलेल्या २५ एकरात ज्वारी लावली तर गजाननरावांचे एकूण किती एकर शेत आहे?
अ)९० एकर ब)६० एकर क)७२ एकर ड)८० एकर
१०) हंगामी पोलिस पाटलाची नेमणूक कोण करतो?
अ)उपजिल्हाधिकारी ब)तहसिलदार
क)मुख्य कार्यकारी अधिकारी ड)जिल्हाधिकारी
११) ६४ चौरस सें.मी क्षेत्रफळ असलेले व बाजू पूर्णांकात असलेले चौरस सोडून एकूण किती आयात काढता येतील?
अ)३ ब)५ क)८ ड)९
१२) अद्रकाची अधिक उत्पादन देणारी जात कोणती?
अ)पुना ब)वायनाड क)रिओद जानिरो ड) माहिम
१३) दोन संख्यांचा मसावी सात असून त्याचा लसावी ७२ आहे त्या संख्या ३:४ प्रमाणात आहेत तर त्या संख्या कोणत्या?
अ)१६,१८ ब)२०,२२ क)१८,२४ ड)२४,२६
१४) फळे व भाजीपाला हे संरक्षण अन्न समजले जाते त्याचे प्रमुख कारण म्हणजे त्यापासून प्रामुख्याने काय मिळतात?
अ)जीवनसत्त्वे ब)खनिजे क)स्निग्धपदार्थ ड) अ व ब
१५) ऑक्टोबर २००४ च्या दुसऱ्या शनिवारी ९ तारिख होती तर त्या महिन्यातील खालीलपैकी कोणता वार पाच वेळा येणार नाही?अ)सोमवार ब)मंगळवार क)बुधवार ड)गुरुवार

उत्तरेः (१-अ), (२-ब), (३-क) , (४-अ), (५-अ), (६-क), (७-अ), (८-ड), (९-ब), (१०-ब), (११-अ), (१२-क),(१३-क ), (१४-ड), (१५-ब )

## टिप्स

■ चेहरा स्वच्छ व चमकदार होण्यासाठी एक चमचा त्रिफळा चूर्ण, मिनिट पाण्यात भिजवून चेहऱ्यावर लेप देणे.
■ चेहऱ्यावर सुरुकुत्या असेल तर त्यावर केशर व बदामची कच्च्या दुधात पेस्ट करुन लावणे.
■ केस गळत असेल तर एक मध्यम आकाराचे डाळींब सालीसकट मिक्सरमध्ये बारीक करणे. जास्वंद फूल, ब्राम्हीपाने, चमचा आवळा पावडर, मेहंदी पाने अंदाजे हे सर्व बारीक करुन ग्रॅम तिळाच्या लोखंडी कढईत मंद गॅसवर तडतड येईपर्यंत गरम करुन कोमट असतानाच एका बाटलीत भरुन ठेवावे व ते केसांना लावावे.
■ जांभळीची बी पिंपल्यवर लावणे.


## विनोद



एका बंबवाल्याने धावतच जाऊन फोन उचलला. दुसऱ्या बाजूनं विचारणा झाली. फारर ब्रिगेड स्टेशन काय?
होय! बंबवाला म्हणाला.
हे बघा, मी नुकतीच माझ्या घरपुढं एक सुंदर बाग लावली आहे आणि त्यात अत्यंत दुर्मिळ अशी फुलझाडं लावली आहेत.....! परंतु आग कोठे लागली आहे बंबवाल्यानं मध्येच थांबवून विचारलं. आणि त्या फुलझाडांसाठी मला हजारो रुपये खर्च करावे लागेले आहेत आणि... तुम्हाला फुलांचं दुकान हवं आहे का बंबवाल्यानं चिडून विचारलं. नको मला फायर ब्रिगेड स्टेशनच हवं आहे, आता मी थोडक्यात सर्व सांगतो. माझ्या शेजारच्या घराला मोठी आग लागली आहे आणि जेव्हा तुमची माणसं आग विझवायला येतील तेव्हा माझ्या बागेची नासाडी होता कामा नये!

## फिल्मी शब्दकोडे





### आडवे संकेत

१) सन् २००२ में एस. अधियनमान के निर्देशन में बनी इस फिल्म में शाहरुख खान, माधूरी दीक्षीत और सलमान खान थे.
६) XX मलिक (संगीतकार)
७) अभिषेक बच्चन और हृषीता भट्ट अभिनीत फिल्म.
८) ईशा देओल की नायीका माँ.
९) ये XX है प्यार के (फिल्म)
१०) सन् २००१ में बनी इस फिल्म में रेखा, माधूरी दीक्षीत, महिमा चौधरी और मनिषा कोईराला थे.
१२) सैफ XXXX (नायक)
१४) XX या पार (फिल्म)
१६) चोरी चोरी XXXXXX (फिल्म)
१७) XXX आयेगी बारात (फिल्म)
१८) खून XXX (फिल्म)
१९) XX मेहता (नायक)
२०) XX लिव्हर (हास्य अभिनेता)
२१) सन् १९९० में बनी सैलाब इस फिल्म का नायक. (सिर्फ नाम)
२२) सन् १९९६ में बनी फरेब इस फिल्म के संगीतकार.
२६) सैफ अली खान, काजोल और आदित्य पांचोली अभिनीत एक फिल्म.
२८) सन् १९९४ में बनी अंदाज अपना अपना इस फिल्म के निर्देशक.
३१) कोई मेरे XXX पुछे (फिल्म)

### उभे संकेत

१) सन् १९९१ में बनी प्रेम कैदी इस फिल्म का नायक.
२) जितेंद्र का नायक बेटा.
३) सन् १९८८ में बनी फिल्म खुन भरी मांग की नायीका.
४) सन् २००३ में बनी फिल्म तेरे नाम का नायक.
५) सन् २००१ में बनी इस फिल्म में अजय देवगन, माधूरी दीक्षीत और प्रिती झिंटा थे.
६) सन् २००० में बनी फिल्म पुकार का नायक.
११) गदर इस फिल्म का नायक.
१२) सन् २००२ में बनी ये है जलवा इस फिल्म की नायीका.
१३) अमिताभ बच्चन, अमृता सिंह, जैकी श्रॉफ और मिनाक्षी शेषांद्री अभिनीत एक फिल्म.
१४) हम XXXXXX रहते है (फिल्म)
१५) अजय देवगन, जुही चावला और नसीरुद्दीन शाह अभिनीत फिल्म.
१७) ऋषी कपूर के अभिनेता पिता. (सिर्फ नाम)
२३) XXX कौन (फिल्म)
२४) बॉबी देओल के नायक पिता.
२५) जय XXX माँ (फिल्म) २७) जिते है XXX (फिल्म)२९) सन् १९८३ में बनी इस फिल्म में अमिताभ बच्चन, रती अग्निहोत्री, ऋषी कपूर और कादर खान थे.
३०) एक पुराने मशहूर संगीतकार.

### मागील फिल्मी उत्तर

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| शि | वा | जी | सा | ट | म | ■ | बु | ■ | गु | ल | श | न |
| ■ | ■ | ■ | ज | ■ | नी | ल | म | ■ | ड्डु | ■ | र्मि | ■ |
| प | ह | चा | न | ■ | षा | ■ | ■ | दि | ■ | ■ | ला | ■ |
| रे | ■ | ■ | च | ■ | को | ई | मि | ल | ग | या | ■ | ला |
| श | त्की | ■ | ले | ■ | ई | श्क | ■ | चा | ■ | ■ | ■ | गु |
| रा | ■ | ■ | स | ■ | रा | ■ | मे | ह | र | बा | न | ■ |
| व | न | ■ | सू | ■ | ला | ■ | ■ | ता | ■ | ■ | ज | ■ |
| ल | ■ | हे | रा | म | ■ | दि | ल | है | तु | म्हा | रा | ■ |
| ■ | ह | ■ | ल | ■ | ■ | ल्ल | ■ | ■ | षा | ■ | ना | ■ |
| ■ | म | ■ | ■ | ■ | बा | गी | ■ | ■ | र | ■ | ■ | ■ |
| ■ | आ | ग | ही | आ | ग | ■ | स | ड | क | छा | प | ■ |
| ■ | प | ■ | ■ | ■ | बा | ■ | ड | ■ | पू | ■ | ■ | रा |
| रा | के | श | रो | श | न | ■ | क | सू | र | ■ | आ | जा |

### देवीच्या वणाचे डाग

१. काळे तिळ व पिवळी राई समप्रमाणात घेऊन कच्चा दूधात वाटून डागावर लावल्याने फायदा होतो.
२. तुरीची डाळ, काकडीचा रस, दूध, गुलाब पाणी १-१ चमचा, १-१ चिमूट हळद, ४०-४५ थेंब लिंबाचा रस, ५ थेंब ग्लिसरिन, तुरीची डाळ पाण्यात भिजवून वाटून घ्यावी. इतर सामग्री मिसळून जाड लेप तयार करुन चेहऱ्यावर लावावा. वाळल्यावर कोमट पाण्याने धुवून घ्यावे. हळू-हळू देवीचे वण नाहिसे होतील.

### चारोळी

मी अगदीच बोलकी
तू खूप अबोल आहे
राजा तुझा रुसवा
मला अगदीच कबूल आहे.

# उद्योजकतेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना रोजगारनिर्माते बनविण्याची गरज

## प्रा. डॉ. देविदास गोल्हार यांचे प्रतिपादन; न्यू आर्ट्स महाविद्यालयात शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आयोजित उद्योजकता विषयावरील शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन करताना डॉ. देविदास गोल्हार, प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे, समन्वयक प्रा. डॉ. मंगेश वाघमारे, विषय तज्ञ ऋषभ गिल, डॉ. हेमंत वंजारे, डॉ. रोहिणी शेळके, डॉ. संजय कळमकर डॉ. अनिल आठरे.

नगर – बदलत्या आर्थिक, सामाजिक आणि व्यावसायिक परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांनी केवळ नोकरी शोधणारे न राहता स्वतःच्या कल्पना, कौशल्ये आणि नवोपक्रमातून 'रोजगारनिर्मिती करणारे उद्योजक' बनणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या नवोपक्रम, उष्मायन व उद्योग विभागाचे संचालक प्रा. डॉ. देविदास गोल्हार यांनी केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे नवोपक्रम, उष्मायन व उद्योग केंद्र आणि मालवीय मिशन शिक्षक प्रशिक्षण केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने, तसेच वाधवानी फाउंडेशनच्या सहकार्याने अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाच्या न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालय (स्वायत्त), अहिल्यानगर येथे आयोजित 'उद्योजकतेची मूलतत्त्वे' या पाच दिवसीय शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. व्यासपीठावर प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे, समन्वयक प्राध्यापक डॉ. मंगेश वाघमारे प्रशिक्षक श्री ऋषभ गिल, डॉ.हेमंत वंजारे, डॉ. रोहिणी शेळके उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात डॉ. मंगेश वाघमारे यांनी बदलत्या रोजगारस्थितीचा उल्लेख करत विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकीय दृष्टिकोन, कौशल्याधारित विचार आणि नवोपक्रमशीलता विकसित करण्याचे महत्त्व स्पष्ट केले. योग्य संधी मिळाल्यास विद्यार्थी नोकरी शोधणारे नव्हे, तर 'रोजगार निर्माण करणारे' बनू शकतात, असे ते म्हणाले. तसेच, या जिल्हास्तरीय शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमाचे यजमानपद न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयाला दिल्याबद्दल त्यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे, कुलगुरू, प्र–कुलगुरू आणि सर्व मान्यवरांचे आभार मानले.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयाचे प्राचार्य आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे सिनेट सदस्य डॉ. बाळासाहेब सागडे यांनी विद्यापीठाच्या सहकार्याने महाविद्यालयात जिल्हास्तरीय शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित होत असल्याबद्दल समाधान व्यक्त केले.

कार्यक्रमादरम्यान सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र–कुलगुरू प्रा. डॉ. पराग काळकर यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे प्राध्यापकांशी संवाद साधला. त्यांनी उपस्थित मान्यवर, आयोजक आणि सहभागी प्राध्यापकांना शुभेच्छा देत महाविद्यालयीन स्तरावर नवोपक्रम आणि उद्योजकतेची संस्कृती रुजविण्यासाठी अशा प्रकारचे प्रशिक्षण कार्यक्रम अत्यंत उपयुक्त ठरतात, असे सांगितले.

प्रमुख पाहुण्यांचा परिचय डॉ. रूपाली मिसकिन यांनी करून दिला. सूत्रसंचालन प्रा. शामल जाधव यांनी केले, तर आभार डॉ. अभिजित सातभाई यांनी मानले.

कार्यक्रमातील विविध सत्रांसाठी ऋषभ गिल, डॉ. रोहिणी शेळके आणि डॉ. हेमंत वंजारी हे तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमास अहिल्यानगर जिल्ह्यातील वाणिज्य, विज्ञान, कला, औषधनिर्माणशास्त्र (फार्मसी) आणि अभियांत्रिकी (इंजिनिअरिंग), प्राध्यापक उपस्थित होते.

# कंपनीने सील केलेल्या जागेत बेकायदेशीर घुसखोरी, चौघा जणांवर गुन्हा दाखल

नगर – नगर तालुक्यातील शिंगवे नाईक ग्रामपंचायत हद्दीत कंपनीने सील केलेले कुलूप तोडून बेकायदेशीरपणे जागेत प्रवेश केल्याप्रकरणी चौघांविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी संदीप अंबादास साठे (वय ३९, रा. अंबिकानगर, केडगाव) हे त्यांच्या कंपनीचे अधिकारी दीपक झगडे आणि अभिषेक पोखरकर यांच्यासह शिंगवे नाईक येथील मिळकत क्रमांक १४१/१/१ मधील जागेची पाहणी करण्यासाठी गेले होते. कंपनीच्या ताब्यात असलेल्या या जागेला रीतसर सील लावण्यात आले होते. मात्र, आरोपी बाबासाहेब अर्जुन जाधव, सचिन अर्जुन जाधव, पुष्पा अर्जुन जाधव आणि अर्जुन भीमराव जाधव (सर्व रा. शिंगवे नाईक, ता.नगर) यांनी जागेचे सील तोडून आत बेकायदेशीर प्रवेश केला व तिथे वास्तव्य सुरू केल्याचे फिर्यादींच्या निदर्शनास आले.

या प्रकरणी संदीप साठे यांच्या फिर्यादीवरून एमआयडीसी पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या कलम ३२९ अन्वये गुन्हा नोंदवला आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार आडबल पुढील तपास करत आहेत.



## गुरुवाणी – २५

## 'भाव' से भाग्य आता है!

प्रत्येकामध्ये असंख्य पेशी असून त्या पेशींमध्ये स्वतंत्र प्रोग्राम असतात. आधुनिक विज्ञान सांगते की, 'प्रत्येक स्वस्थ शरीरात कॅन्सर पेशी असतात पण त्या पेशी क्टीव्ह झाल्या तरच कॅन्सर होतो'. असे असंख्य प्रोग्राम शरीरात असतात. म्हणजेच बीज असतात. ज्या बिजाला पोषक वातावरण निर्माण केले जाते, तसे ते डेव्हलप होते. बीज अंकुरित होण्यासाठी आवश्यक गोष्टी असतात, त्याच्या जोडीला 'इमोशन' (भाव) ही आवश्यक असतात. सगळे कर्म हे बीज असतात. त्या कर्माला इमोशनही आवश्यक असतात. चंडकौशिकचा भाव बदलला आणि सगळा नजारा बदलला. अर्जुन मालीचा भाव बदलला आणि सगळं काही बदलले. म्हणूनच 'आश्रव' करताना 'भाव' महत्त्वाचा असतो. भाव बदलणे हे सर्वस्वी तुमच्या हातात असते , अशी मान्यता आहे. पण वस्तुस्थिती अशी आहे की, 'भाव बदलणे हे तुमच्या हातात नसते'. कोणालाही राग यावा अशी इच्छा नसते. पण राग अचानक उफाळून येतो. कारण कोणी तरी राग आणतो. तसेच प्रेम सुद्धा कोणी तरी करायला लावते तेव्हाच होते. आपण म्हणतो की, 'माझ्यावर कोणाचे प्रेमच नाही. याला कारण तुम्हाला प्रेम करवता येत नाही'. तीर्थंकर भगवान सांगतात, 'भाग्य से भाव नही आते, भाव से भाग्य आता है'. मैनासुंदरीसाठी वडीलांनी कुष्ठरोगी असलेल्या श्रीपालला निवडले. सगळ्यांनी त्याच्या निर्णयाचा निषेध केला. पण त्याला आपल्या मुलीला धडा शिकवायचा होता. अनेकांनी मैनासुंदरीला सांगितले की, तू वडीलांची माफी माग. पण तिने नकार दिला. 'परिस्थिती कशीही असो, सुखी व्हायचे की दुखी हे माझ्या हातात आहे', या तीर्थंकरांच्या शिकवणुकीवर तिची पूर्ण श्रद्धा होती. तिचा कुष्ठरोगी सोबत विवाह झाला. ती हसतमुख होती. श्रीपाल मैनासुंदरीला म्हणतो की, 'मी तझ्या योग्य नाही, तू दुसरा योग्य वर शोध'. पण ती स्पष्ट नकार देते. नंतर ते संताच्या दर्शनासाठी जातात. संत तिला तीर्थंकरांची शक्ती ग्रहण करण्याचा सल्ला देतात. मैनासुंदरीने ते ऐकले व पंचपरमेष्ठीची आराधना केली. पुढे श्रीपाल रोगमुक्त झाला. इसके लिए 'भाव का आश्रव' महत्वपूर्ण है.

**– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.**

# रस्त्यांच्या कामाबाबत डॉ. सुजय विखे यांनी वस्तुस्थिती मांडली

## टिका करण्यापुर्वी विरोधकांनी अभ्यास करण्याचे विनायक देशमुख यांचे आवाहन



नगर – मागील सहा महिन्यापासून सुरू असलेल्या अमेरिका–इराण युद्धामुळे डांबराच्या पुरवठ्यात मोठी घट झाली असून नगर– मनमाड रस्त्यासह देशभरातील अनेक महत्त्वाच्या रस्त्यांच्या कामावर याचा मोठा प्रतिकूल परिणाम झाला आहे. यासंदर्भात माजी खासदार डॉ. सुजय विखे पा . यांनी अत्यंत स्पष्ट व अभ्यासपूर्ण शब्दात वस्तूस्थिती मांडली आहे. केवळ टिका करण्यापेक्षा विरोधकांनी वस्तुस्थितीचा अभ्यास करावा, असे आवाहन जिल्हा नियोजन समितीचे सदस्य विनायक देशमुख यांनी केले आहे.

यासंदर्भात बोलताना श्री. देशमुख म्हणाले, डॉ. सुजय विखे पा. यांनी नगर – मनमाड रस्त्याच्या कामाचा आढावा घेताना अत्यंत स्पष्ट व अभ्यासपूर्ण शब्दात वस्तूस्थिती मांडली आहे. त्या अंतर्गत फेब्रुवारी २०२६ आणि ऑगस्ट २०२६ मध्ये असलेले डांबराचे तुलनात्मक भाव , या काळात होणारा डांबराचा पुरवठा याची माहिती डॉ . सुजय विखे यांनी पत्रकारांशी बोलताना दिली आहे. फेब्रुवारी २०२६ मध्ये प्रति मेट्रिक टन रु. ४२०००/– असलेले डांबराचे दर जुलै २०२६ मध्ये प्रति मेट्रिक टन रु. ८६०००/– अशा उच्चांकी स्तरावर पोहोचल्याचे सांगुन डॉ . सुजय विखे यांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील वर्तमानपत्रांमध्ये यासंदर्भात वेळोवेळी प्रसिद्ध झालेले लेख देखील पत्रकारांसमोर मांडले. एका अर्थाने डॉ. सुजय विखे पा. यांनी या निमित्ताने पेट्रोलियम पदार्थ व डांबर पुरवठ्याबाबत आंतरराष्ट्रीय वस्तुस्थिती सांगुन नागरिकांचे उदबोधनच केले आहे.

डॉ. सुजय विखे पा. यांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या लहरी स्वभावामुळे जगावर हे युद्ध लादले गेल्याचे आणि त्यामुळे अनेक देशांना पेट्रोलियम पदार्थ तसेच डांबर पुरवठ्याबाबत मोठा फटका बसल्याचे देखील स्पष्ट केले . युद्धाच्या परिस्थितीमुळे देशातील आणि राज्यातील, पर्यायाने अहिल्यानगर जिल्ह्यातील नगर–मनमाड रस्त्याच्या कामात मोठा गतीरोध निर्माण झाला असून अप्रत्यक्षपणे याला अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे कारणीभूत असल्याची वस्तुस्थिती डॉ. सुजय विखे पा. यांनी निर्देशित केली होती.

मात्र विखे द्वेषाची कावीळ झालेल्या जिल्ह्यातील विखे विरोधकांना लगेच कंठ फुटले. काही महानुभावांनी तर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना थेट मराठी भाषेत पत्र लिहून स्वतःच्या बुद्धिमत्तेची दिवाळखोरी स्पष्ट केली. विखे परिवाराच्या पारंपरिक विरोधकांनी त्यांच्यावर टीका जरूर करावी, मात्र टीका करण्यापूर्वी वस्तुस्थितीचा अभ्यास करावा आणि किमान स्वतःचे हसे करून घेऊ नये. असेही देशमुख म्हणाले.

# बीड जिल्ह्याच्या धर्तीवर नगरमध्ये सहकार संकुल उभारा; पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे मागणी

नगर – बीड जिल्ह्यात स्वतंत्र सहकार संकुल उभारले जात आहे. तशाच पद्धतीने सहकाराची पुण्यभूमी असलेल्या अहिल्यानगर जिल्ह्यात अद्ययावत असे सहकार संकुल उभारावे, अशी मागणी अभय ललवाणी यांनी जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे.

ललवाणी यांनी निवेदनात म्हटले आहे, अहिल्यानगर जिल्ह्याला सहकार चळवळीचा दैदीप्यमान असा इतिहास लाभलेला आहे. दूरदृष्टी असलेल्या अनेक दिग्गज नेत्यांनी जिल्ह्यात सहकार चळवळ निर्माण केली व वाढवली. त्यामुळेच जिल्ह्याला सहकाराची पंढरी म्हणून ओळखले जाते. भक्कम सहकार चळवळीमुळे राज्यातील व देशातील राजकारणामध्ये नगर जिल्ह्याचा नेहमीच दबदबा राहिलेला आहे. अशा या सहकाराच्या पुण्यभूमीत सहकार विभागाचे कार्यालय म्हणजेच जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहिल्यानगर यांचे कार्यालय सध्या भाडेतत्त्वावरील जागेत कार्यरत आहे. नगर तालुका उपनिबंधक, सहकारी संस्था हे कार्यालय देखील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या व्यापारी संकुलात कार्यरत आहे. दोन्ही कार्यालयांना अद्यावत सुविधा नाहीत. राज्याच्या सहकार विभागाने ४ जून २०२५ रोजी बीड जिल्ह्यात स्वतंत्र सहकार संकुल इमारत बांधकामासाठी १४९८.७९ लक्ष इतक्या किमतीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिलेली आहे. बीड येथे सहकार संकुल उभारले जात आहे. मात्र सहकार चळवळीत राज्यात व देशात अव्वल असलेल्या नगर जिल्ह्याचे सहकाराचे मुख्यालय हे भाडेतत्त्वावरील जागेत असणे ही बाब मनाला खटकणारी आहे.

तरी या सर्व बाबींचा विचार करून आपण बीड जिल्ह्याच्या धर्तीवर अहिल्यानगर येथे अद्ययावत सहकार संकुल उभारावे, असे निवेदनात म्हटले आहे.



भारतीय वायुसेनेच्या तांत्रिक विभागात स्पर्धात्मक परीक्षा प्रक्रियेतून निवड झाल्याबद्दल यश ठुबे याचा सत्कार करताना एकता महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य राजेंद्र मेहेत्रे. (छाया – विजय मते)

# एकता कॉलेजच्या यश ठुबेची एअर फोर्समध्ये निवड

नगर – नगर येथील सावेडी उपनगरातील तपोवन रोड येथील एकता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयामध्ये प्रथम वर्ष विज्ञान शाखेत शिक्षण घेणाऱ्या यश देवराम ठुबे या विद्यार्थ्याची स्पर्धात्मक भरती प्रक्रियेतून भारतीय वायुसेनेच्या तांत्रिक विभागात निवड झाली आहे.

वायुसेनेच्या तांत्रिक शाखेत देशभरातून आलेल्या उमेदवारांमधून कठीण लिखित परीक्षा, शारीरिक चाचणी आणि तांत्रिक विषयांचे टप्पे पार पाडावे लागतात, ज्यामध्ये आपल्या अभ्यासातील सातत्य व कौशल्याच्या जोरावर यश ठुबे याने हे यश मिळवत देशाच्या संरक्षणात आपले महत्त्वाचे योगदान निश्चित केले आहे. यश याचे वडील देवराम हे भारतीय सेनादलातून सेवानिवृत्त झालेले असून त्यांच्या योग्य मार्गदर्शनामुळे मला हे यश मिळाल्याचे त्याने सांगितले.

यश ठुबे हा नगर तालुक्यातील अकोळनेर गावचा रहिवाशी असून नगरमध्ये शिक्षण घेत खूप मेहनत, जिद्द आणि चिकाटीच्या बळावर मिळवलेल्या या यशाबद्दल एकता महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य राजेंद्र मेहेत्रे यांच्या हस्ते त्याचा विशेष सत्कार करण्यात आला.

यावेळी कॉलेजच्या प्रा. कविता वाकडे, प्रा. ओंकार सुरग, प्रा. हर्षद कासार, दिपाली गिरी, ज्योती हारदे आदी उपस्थित होते. त्याच्या या प्रेरणादायी कामगिरीने महाविद्यालयातील व परिसरातील तरुणांना देशसेवची नवी दिशा दाखवली आहे, असे मेहेत्रे यांनी सांगितले.

# ग्रामपंचायत अधिकाऱ्यांचा ग्रामसभांवर बहिष्कार

## संघटनेचे जिल्हा परिषद प्रशासनाला निवेदन



जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विजय मुळीक यांना निवेदन देताना युवराज पाटील, संदीप लगड, बापूसाहेब राजळे, संपत दातीर, आनंद कांडेकर आदी.

नगर – जळगाव जिल्ह्यातील पारोळा तालुक्यातील शिवरे दिगर येथे ग्रामसभेदरम्यान ग्रामपंचायत अधिकारी पी. एन. पाटील यांच्यावर झालेल्या अमानुष हल्ल्यात त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याच्या घटनेचा अहिल्यानगर जिल्हा ग्रामपंचायत अधिकारी संघटनेने तीव्र निषेध नोंदविला आहे. ग्रामपंचायत अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न ऐरणीवर आल्याने राज्य संघटनेने १८ ऑगस्ट २०२६ पासून आयोजित होणाऱ्या ग्रामसभांवर अनिश्चित काळासाठी बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे.

या संदर्भात जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विजय मुळीक यांना संघटनेच्या वतीने निवेदन देण्यात आले. यावेळी जिल्हाध्यक्ष युवराज पाटील, ग्रामपंचायत अधिकारी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन संदीप लगड, कायदे सल्लागार बापूसाहेब राजळे, नगर तालुका अध्यक्ष संपत दातीर, आनंद कांडेकर, तालुका सचिव रामदास सांगळे, वैभव वाघ, लेखापरीक्षक कृष्णा बडे, बाजीराव पवार, रूबेन वैराळ यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी व ग्रामपंचायत अधिकारी उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे, या राज्यव्यापी निर्णयाची अंमलबजावणी अहिल्यानगर जिल्ह्यातही करण्यात येणार आहे. याबाबत जिल्हा प्रशासनाला निवेदन देऊन जोपर्यंत शासनस्तरावरून ग्रामसभेबाबत आवश्यक त्या सुधारणा करण्यात येत नाहीत व ग्रामपंचायत अधिकारी यांच्या सुरक्षितेबाबत स्पष्ट शासन निर्देश निर्गमित होत नाहीत, तोपर्यंत जिल्ह्यात ज्या ग्रामपंचायतींच्या ग्राम सभा आयोजित करण्यात आल्या आहेत. तसेच यापुढील काळात होणाऱ्या ग्रामसभेत सचिव म्हणून ग्रामपंचायत अधिकारी कामकाज करणार नाही असा ठाम निर्णय संघटनेच्या वतीने घेण्यात आला.

ग्रामपंचायत अधिकारी हा गावपातळीवर शासन आणि नागरिक यांच्यातील महत्त्वाचा दुवा म्हणून काम करतो. शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजना, जन्म–मृत्यू नोंदणी, विविध दाखले व अभिलेख, जनगणना, निवडणूक प्रक्रिया, आपत्ती व्यवस्थापन, शासकीय अभियानांची अंमलबजावणी यासह अनेक महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या ग्रामपंचायत अधिकाऱ्यांवर असतात. शिवरे दिगर येथील घटनेचा निषेध करताना ग्रामपंचायत अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेबाबत शासनाने तातडीने ठोस निर्णय घ्यावा आणि भविष्यात अशा प्रकारच्या घटना घडणार नाहीत यासाठी प्रभावी सुरक्षा यंत्रणा निर्माण करावी, अशी मागणी संघटनेने केली आहे.

# 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' योजनेमुळे जिल्ह्यातील २७६० शेतकऱ्यांची ३८३९ हेक्टर जमीन झाली सुपीक

नगर – जलसंधारण विभागामार्फत राबविण्यात आलेल्या 'गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार' या योजनेच्या अंमलबजावणीमुळे जिल्ह्यात ३८३९ हेक्टर जमीन सुपीक झाली आणि त्याचा तब्बल २७६० शेतकऱ्यांना लाभ झाला, अशी माहिती मृद व जलसंधारण विभागाचे कार्यकारी अभियंता पांडुरंग गायसमुद्रे यांनी दिली आहे.

'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार', ही महाराष्ट्र शासनाची एक महत्त्वाची योजना आहे. या योजनेचा मुख्य उद्देश तलाव, बंधारे आणि नाल्यांमधील गाळ काढून जलसाठवण क्षमता वाढवणे आणि तो गाळ शेतात टाकून जमिनीची सुपीकता सुधारणे हा आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यात 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. गेल्या तीन वर्षात या योजनेतच्या ५३५कामांना प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. त्यापैकी ४०५ कामे भौतिकदृष्ट्या पूर्ण झाली आहेत. या अभियानात जिल्ह्यात ७१.९१ लक्ष घ. मी. गाळाचा उपसा झाला आहे.हा गाळ ३८३९ हेक्टर शेतजमिनीवर पसरण्यात आला. त्याचा लाभ २७६० शेतकऱ्यांना झाला. अहिल्यानगर जिल्ह्यात अंदाजित ७१०० सघमी इतका पाणीसाठा वाढण्यास मदत झाली आहे.

'गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार', या योजनेंतर्गत गाळ वाहून नेणाऱ्या पात्र शेतकरी लाभार्थ्यांना प्रती एकर ३५.७५ रुपये प्रति घनमीटर याप्रमाणे १५ हजार रुपयांच्या मर्यादेत अनुदान देण्यात येते. हे अनुदान फक्त अडीच एकर पर्यंत म्हणजेच ३७ हजार ५०० रुपये (जास्तीत जास्त) देय राहते. 'नाला खोलीकरण व रूंदीकरण' या योजनेंतर्गत गाळ काढण्यासाठी यंत्रसामुग्री व इंधन खर्च यासाठी राज्य शासनाकडून स्वयंसेवी संस्थांना ३७.७५ रुपये प्रति घनमिटर या दराने मोबदला अदा केला जातो.

धरणांमधील किंवा जलसाठे, नाल्यांमधील गाळ काढल्याने साठ्याची जलसाठवण क्षमता वाढते. भुमिगत पाझर सक्रिय होऊन भूजल पातळी उंचावण्यास मदत होते. भुमिगत जलसाठ्यांचे पुनरुज्जीवन होते. शिवाय गाळ शेतजमिनीत टाकल्याने जमिनीची सुपिकता व उत्पादकता वाढते. मातीतील सुक्ष्मजीवांचे संवर्धन होते. असेही कार्यकारी अभियंता गायसमुद्रे यांनी सांगितले.

# 'जीवन ज्योत' च्या फिजियोथेरपी डिप्लोमाचा १०० टक्के निकाल

नगर – येथील जीवन ज्योत मेडिकल फाउंडेशनच्या बॉम्बे इन्स्टिट्यूट ऑफ व्होकेशनल ट्रेनिंगचा डिप्लोमा इन फिजियोथेरपी शाखेचा निकाल शंभर टक्के लागला आहे.

या परीक्षेत हमिद जैनब मुर्तजा या विद्यार्थ्याने ७६.११ टक्के गुण मिळवून डिस्टिंक्शन प्राप्त केले आहे, तर आलिया हनीब खान हिने ७९.५६ टक्के गुणांसह डिस्टिंक्शन मिळवले आहे. तसेच विराज विश्वास नागरगंजे या विद्यार्थ्याने ७४.४४ टक्के गुण मिळवून फर्स्ट क्लास प्राप्त केला आहे. या यशस्वी विद्यार्थ्यांनी परीक्षेत प्रथम, द्वितीय व तृतीय स्थान मिळवले आहे. या यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे प्राचार्य व शिक्षक, पालक यांनी अभिनंदन केले आहे.

# जिल्ह्यातील सर्वात मोठ्या रक्तदान शिबिराचे २२ ऑगस्टला अहिल्यानगर शहरात आयोजन

## मोबाईल रिटेल्स असोसिएशनच्या शिबिरात ७,५०० पिशव्या संकलनाचे उद्दिष्ट

नगर – रक्ताचा तुटवडा दूर करून नवीन रक्तदाते निर्माण करण्यासाठी शहरात मोबाईल रिटेल असोसिएशनच्या वतीने महा रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. २२ ऑगस्ट रोजी सकाळी ७ ते रात्री ९ वाजेपर्यंत नवीन टिळक रोडवरील नंदनवन लॉन्स येथे हे महारक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या महा रक्तदान शिबिरास काका ट्रस्ट, आय लव्ह नगर व ऑल इंडिया मोबाईल रिटेल्स असोसिएशन यांचे सहकार्य लाभले आहे. जिल्ह्यातील सर्वात ठरलेल्या या रक्तदान शिबिराचे हे सलग ५ वे वर्ष आहे, अशी माहिती मोबाईल रिटेल असोसिएशनचे राज्याचे अध्यक्ष अजित जगताप यांनी दिली.

अधिक माहिती देताना असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष अजित पवार म्हणाले, या महा रक्तदान शिबिराचे उद्घाटन २२ ऑगस्टला पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्या हस्ते होणार आहे. या सोहळ्यास स्वागताध्यक्ष आमदार संग्राम जगताप, मुख्य उपस्थिती महापौर ज्योती गाडे, उपमहापौर धनंजय जाधव व उद्योजक नरेंद्र फिरोदिया उपस्थित राहणर आहेत. तसेच प्रमुख उपस्थिती जिल्हाधिकारी पंकज आशिया, जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, महापालिकेचे आयुक्त यशवंत डांगे व जिल्हा शल्य चिकित्सक संजय घोगरे यांची लाभणार आहे. याशिवाय सर्व नगरसेवक, सर्व मोबाईल कंपन्यांचे वितरक यांच्यसह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

असोसिएशनचे उपाध्यक्ष गोरख पाडोळे यांनी सांगितले, अहिल्यानगर मोबाईल रिटेल असोसिएशनच्या वतीने गेल्या ४ वर्षांपासून अविरतपणे महा रक्तदान शिबिराचे आयोजन नगरमध्ये होत आहे. गेल्यावर्षी शहरासह व ग्रामीण भागातून मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे तब्बल ५,२५० रक्तपिशव्यांचे संकलन झाले होते. आता या उद्देशामध्ये वाढ करून यावर्षी ऐतिहासिक लक्ष्य निश्चित करण्यात आले असून शहरातून ५,००० व जिल्ह्यातील इतर भागांमधून २,५०० रक्तदान असे एकूण ७,५०० हून अधिक रक्तदान घडवून आणण्याचा संकल्प केला आहे. यासाठी सर्व रक्तपेढ्या या उपक्रमात सहभगी होणार आहेत.

आ.संग्राम जगताप यांनी आवाहन केले की, रक्तदान हे जीवनदान असल्याने सर्वश्रेष्ठ आहे. अहिल्यानगर मोबाईल रिटेल असोसिएशनच्या या उपक्रमाने नवे रेकॉर्ड रचले आहेत. त्यामुळे ऐतिहासिक ठरलेल्या या महा रक्तदान शिबिरातही यावर्षी जास्तीत जास्त युवक, युवती व नागरिकांनी सहभागी होत कर्तव्य बजवावे.

नरेंद्र फिरोदिया यांनी आवाहन केले की, अहिल्यानगर मोबाईल रिटेल असोसिएशनच्या या महा रक्तदान शिबिरामुळे जिल्ह्यातील रक्ताचा तुटवडा कमी होत असल्याने असोसिएशनचा पुढाकार प्रशंसनीय आहे.

या उपक्रमाच्या माध्यमातून जिल्ह्यातील सर्वात मोठ्या रक्तदान अभियानाचे ध्येय निश्चित करण्यात आले असून यामध्ये मोठ्या संख्येने युवक, नागरिक व महिलांनी उत्स्फूर्तपणे सहभगी होत जीवनदान देण्यासाठी रक्तदान करावे. या शिबीर स्थळी महिलांसाठी रक्तदानासाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली असल्याने महिलांचा सक्रिय सहभाग अपेक्षित आहे. सर्वांनी या मानवतावादी अभियानाला बळ द्यावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.या महा रक्तदान शिबिराचे नियोजन अमित बुरा, संतोष बालदोटा, रितेश सोनीमंडलेचा, मनीष चोपडा, अतुल रच्चा, मनोज बारलोटा, हिरा खुबचंदानी, राकेश सोनीमंडलेचा, प्रीतम तोडकर व साजिद खान आदींसह कार्यकर्ते करत आहेत.

